सं.नि.

. ठाणें.

# व्यापार संबंधी व्याख्यानें.

रा० ब० माधवराव गोविंद रानडे, एम ए. एल एल बी.

फर्स्टक्लास फर्स्टग्रेड स० जज्ज,

यांणीं

## पुणें व्यापारोत्तेजक मंडळीपुढें दिलीं.

तीं,

लोककल्याणेच्छु वर्तमानपत्रावरून पुनः

तपासून शुद्ध करून,

रा० रा० विनायक बाळकृष्ण दामले, म्यानेजर

लोककल्याणेच्छु, यांणीं सर्वांच्या उपयोगाकरितां सर्व एकत्र

करून त्यांचें हें लहानसें पुस्तक छापून तयार केलें आहे.

किंमत ४ आणे टपाल व बंगी खर्च ०२.

सं. नि. १०६
१६

# व्यापार संबंधी व्याख्यानें.

रा० ब० माधवराव गोविंद रानडे फर्स्टक्लास

फर्स्टग्रेड स० जज्ज,

याणीं.

## पुणें व्यापारोत्तेजक मंडळीपुढें दिलीं.

तीं,

लोककल्याणेच्छु वर्तमानपत्रावरून पुनः

तपासून शुद्ध करून,

रा० रा० विनायक बाळकृष्ण दामले, म्यानेजर

लोककल्याणेच्छु यांणीं सर्वांच्या उपयोगाकरितां सर्व एकत्र

करून त्यांचें हें लहानसें पुस्तक छापून तयार केलें आहे.

किंमत ४ आणे टपाल व बंगी खर्च० ०२

हे पुस्तक पुणे येथे "विठ्ठल सखाराम अग्निहोत्री" यांचे
छापखान्यांत छापिलें. माहे आगष्ट. १८७३. ईसवी.

# प्रस्तावना.

तारीख ८ दिसेंबर सन १८७२ इसवी रोजीं फडतरे यांचे वाड्यांत हिंदुस्थानांतील द्रव्यसंपत्ती कमी झाली ती वाढविण्याविशीं व हिंदुस्थानांत कलाकौशल्य ज्यास्ती वाढविण्याचे कामीं लोकांस उत्तेजन मिळण्याकरितां कोणते उपाय करावे या विषयावर रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांणीं पुणें व्यापार कंपनीच्या सभेंत त्या कंपनीस जो रपोट केला त्यापैकीं राव बाहादूर माधवराव गोविंद रानडे याणीं:—

१. मित व्यय व्हावा आणि तो असा व्हावा कीं, जो आपला खर्च आहे त्यापैकीं निदान एक तृतीयांश बचून आपले संग्रहास पडेल.

२. कला कौशल्य व कारखानें वाढविणेंविषयीं लोकांस उत्तेजन येण्याकरितां मितव्ययापासून संग्रह होईल तो आपले देशांत तयार झालेले अगर उत्पन्न झालेले जिनसांचा खप हल्लीं होत आहे त्यापेक्षां आपल्या संसाराच्या कामीं ज्यास्ती होण्याकडे लागावा.

या दोन विषयांवर दोन व्याख्यानें दिलीं त्या दोन व्याख्यानांचा सारांश या पुस्तकांत घेतला आहे.

सदहू दोन्ही व्याख्यानें लोककल्याणेच्छू वर्तमान पत्रांत छापिलेलीं आहेत परंतु तीं वेगळ्या वेगळ्या पत्रांतून थोडथोडीं असल्यामुळें वाचणारांस एकदम सर्व व्याख्यान पहाण्यास व पूर्वापर संबंध जुळण्यास अडचण पडते, ती अडचण पडूनये व हा अत्यंत उपयुक्त विषय निरंतर साद्यंत सर्वांच्या डोळ्यांपुढें रहावा या हेतूनें तीं सर्व व्याख्यानें पुनः रा० ब० माधवराव गोविंद रानडे यांकडून तपासून घेऊन आम्हीं त्यांनें हें लहानसें पुस्तक करून सर्व स्वदेशाभिमानी लोकांस नजर केलें आहे.

**विनायक बाळकृष्ण दामले.**

**म्या. लो.**

स.।कि.२.८

# राव बहादूर माधवराव गोविंद रानडे यांचीं व्याख्यानें.

आज ही सभा ज्या संबंधानें भरली आहे, व ज्या गोष्टींचा विचार आमचे मित्र रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांणीं आपले रपोटांत करण्याविषयीं सूचना केली, त्यांपैकीं मजला फक्त दोन विषयांवर चार शब्द बोलावे अशी सूचना आहे, त्या विषयांचे स्वरूप नीट ध्यानांत येण्यास (१) राजकीय व (२) व्यापार संबंधानें या देशांतील संपत्तीची कशी काय व्यवस्था आहे तिची प्रथम थोडी समजूत करून घेतली पाहिजे. त्याशिवाय या गोष्टींचा विचार लोकांचे मनांत येणार नाहीं, सबब त्याजबद्दल मी प्रथम थोडी हकीकत कळवीत आहे.

## (१) राजकीय संबंधानें संपत्तीची स्थिती.

हिंदुस्थानांतील लोक हल्लीं जे कांहीं उद्योग करीत आहेत त्या उद्योगानें जितकी द्रव्यसंपत्ति हिंदुस्थानांत वाढावी असें वाटतें त्या मानानें वाढत नाहीं. या संबंधानें लोकांची अशी ओरड आहे कीं, आपण करावयाची तितकी मेहनत करीत असतां व उद्योग करीत असतां असें कां व्हावें? असें बोलून नेहमी लोक कुरकुर करतात, परंतु त्यांस त्याची कारणें काय हें समजत नाहीं. जसें एखाद्या रोग्यास धातुक्षयाचा विकार झाला ह्मणजे बाह्य दर्शनीं प्रकृतींत विपरीत प्रकार दिसत नाहीं, तथापि दिवसें दिवस शक्तीचा ऱ्हास होतो, व आपणास काय होतें हें ज्याचें त्यास कळत नाहीं, तद्वत् या देशाच्या संपत्तीची दशा झाली आहे. त्यास अशी दशा आपल्या देशास प्राप्त झाली आहे त्याची कारणें मुख्य दोन आहेत. परदेशस्थ लोक हिंदुस्थानांत राज्य करणारे आहेत हें एक, आणि हिंदुस्थानांत कलाकौशल्य व कारखानें पाहिजेत तितके वाढविण्याजोगे आपल्यापाशीं साधन नाहीं, हे दुसरें कारण होय.

परदेशस्थ राज्यकर्ते हिंदुस्थानांत असले कारणानें जी देशांतील संपत्तीची व्यवस्था होत आहे त्या विषयीं विचार पाहातां, हिंदुस्थानांत खुद्द इंग्रज सरकाचे ताब्यांत जो मुलुख आहे त्याचें क्षेत्र ९ लक्ष चौरस मैल आहे. त्यांत सुमारें १५ कोटींहून थोडी ज्यास्त प्रजा राहते. तिजपासून इंग्रज सरकारास दर साल ५० कोट रुपये वसूल येतो. त्यांपैकीं लोकांवर कर व धारे आहेत त्यांचें उत्पन्न पंचेचाळीस कोटींहून जास्ती आहे. बाकी सुमारें सहा कोट रुपये चिनी लोकांकडून अफूचे व्यापाराचे संबंधानें सरकारास ऐन नफ्याचे येतात, ह्मणून ते रुपये आपले देशास मिळतात असें ह्मटलें पाहिजे. हें कराचें ओझें वरील प्रजेवर सारिखें वाटलें असतां दर माणशीं दर साल ३ रुपये बसतात. आतां पंधरा कोटी प्रजे पैकीं एक तृतीयांश बायका व एक तृतीयांश मुलें आहेत तीं वजा केलीं असतां काम धंदा करणारीं ५ कोट मनुष्यें राहतात, त्यांवर ४५ कोट सारखे वांटले तर दरसाल दर माणशीं ९ रुपये प्रमाणें बसतात.

हिंदुस्थानांत जे नेटिव मांडलिक राजे रजवाडे व संस्थानी वगैरे आहेत त्यांचे ताब्यांत जो मुलुख आहे त्यांचें क्षेत्र सुमारें ६ लक्ष चौरस मैल आहे. त्यांत पांच कोट प्रजा राहते. तिजपासून त्यांजला दरसाल २० कोट रुपये वसूल येतो. त्या लोक संख्येवर कर व धाऱ्याचे रुपये सारखे वांटले असतां दरसाल दर माणशीं ४ रुपये प्रमाणें आकार बसतो. त्या लोक संख्येपैकीं बायका मुलें मिळून दोन तृतीयांश कमी करून फक्त काम करणाऱ्या पुरुष संख्येवर कराची रक्कम सारखी वांटली असतां दरसाल दर माणशीं १२ रुपये कर बसतो.

वर लिहिलेले ठोकळ तपशिला वरून असें दिसतें कीं, इंग्रज सरकारचे ताब्यांत राहणारे लोकांस दर मनुष्यास सरकार देणें रुपये ९, व आपले राजे व संस्थानिक यांच्या प्रजेस दर मनुष्यास सरकार देणें रुपये १२ या प्रमाणें पडतें. यावरून इंग्रज सरकारचे प्रजेवर कर व धाऱ्याचा बोजा आहे, त्याहून नेटिव संस्थानांतील प्रजेवर

ज्यास्ती धान्याचा अजमास दिसतो, तथापि त्यांच्यापेक्षां इंग्रजी अंमलांत प्रजेची ज्यास्ती नागवण होत आहे असें पुढील दृष्टांतावरून दिसून येईल.

एका कुटुंबाचे संबंधानें हा विचार सहज ध्यानांत येतो. पाहा, एका कुटुंबांत कांहीं माणसें श्रम करितात, व कांहीं आळशी बसून खातात, तथापि एकत्र कुटुंबाचा संसार चालत आहे तोंपर्यंत कुटुंबांतील कुटुंबांतच एकाच्या हातून किंवा दोघांच्या हातून त्याचा समाईक प्राप्तीचा व्यय होतो, हा एक प्रकार. आतां असें न होतां सदहू कुटुंबांत कोणी आळशी माणसें नाहींत अशी कल्पना केली. व मेहेनती माणसांस आपल्या कुटुंबांतील आळशी माणसें पोसण्याचें कमी झालें, त्या ऐवजीं त्या कुटुंबाखेरीज दुसऱ्या कुटुंबास, वर्षास जो कांहीं पैसा पूर्वी आळशी माणसें खाऊन जात होतीं त्याहून कमी पैसा वरात करून पाठवून द्यावा असा हुकूम झाला, तर एकंदर कुटुंबाचे व प्रपंचाचे संबंधानें पहिल्या गोष्टीपासून जितकी त्या कुटुंबाचे समुदायाची हानी होते, त्यापेक्षां दुसऱ्या व्यवस्थेनें अधिक हानी होते. तद्वत् आपली सांप्रतची स्थिति आहे.

वर लिहिल्याप्रमाणें इंग्रज सरकार उत्पन्न करीत आहे त्यापैकीं हिंदुस्थानांतील हिंदुस्थातांत किती पैसा राहतो त्याचा तपशिल पाहूं जातां, दरसालाचा अजमास असा आहे कीं, पन्नास कोटी वसुलपैकीं अजमासें साडे दहा कोट रुपयांची वरात हिंदुस्थानचे सरकारास विलायतेंत हिंदुस्थानचे संबंधानें जें राज्य प्रकरणीं खर्चाबद्दल देणें पडतें त्याचे तजविजीकरितां धाडून द्यावी लागते त्याचा पोट तपशिल येणेंप्रमाणें.

१॥ कोट रुपये हिंदुस्थानच्या सरकारी कामाकरितां विलायतेस माल खरेदी होऊन येतो त्याचा अजमास.

-॥- जे रुपये नौकर लोक विलायतेस आहेत, त्यांचा पगार व इस्टाब्लिशमेंटचा खर्च अर्धा कोट.

२॥. लष्करांत उमेदवार लोक नवीन ठेवतात त्याचा खर्च व आरमार संबंधीं खर्च.

४॥- हिंदुस्थानचें राज्य ब्रिटिश लोकांनीं प्रथम काबीज केलें, व त्याचें वेळो वेळीं संरक्षण केलें, त्या संबंधानें सरकारास जें कर्ज झालें त्याचा एकंदर अजमास सुमारें १०० कोट रुपये आहे. त्यांपैकीं अजमासें पांच पासून दहा कोट रुपये कर्ज नेटिव लोकांनीं सरकारास दिलें आहे त्याचें व्याज आपल्या लोकांस मिळतें तें खेरीज करून बाकी ९० कोट रुपयांचें सालीना व्याज विलायतेचे लोकांस आपण भरतों त्याचा अजमास

१॥- सदर्हू रकमेशिवाय विलायतेच्या लोकांनीं या देशांत रेल्वे बांधून गाड्या चालू केल्या त्या रेल्वेच्या कामांत सुमारें ९० कोट रुपये खर्च केले त्याबद्दल दरशेंकडा पांच रुपयें प्रमाणें व्याज देण्याची जामीनकी सरकारानीं घेतली आहे. त्या रकमेचें व्याज ४॥ कोट रुपये होतें. पैकीं रेल्वेचा खर्च भागून उत्पन्न राहतें तें वजा करून निवळ सरकारास नुकसान भरून द्यावें लागतें त्याचा आकार आलीकडे कांहीं वर्षें

— सुमारें १॥ कोट रुपये होतो.

१०॥

५॥ कोट रुपये सदर्हू शिवाय या देशांत लष्करचे अंमलदार युरोपियन लोक सुमारें ७००० आहेत. व लष्करचे युरोपियन शिपाई सुमारें ६०००० आहेत. तसेंच सिविल अंमलदार लहान मोठे युरोपियन सुमारें ५००० आहेत बाकी व्यापारी उदमी वगैरे लोक मिळून युरोपियन दीड लाख लोकांचा अजमास आहे. त्या सर्व लोकांस पगार व प्राप्तया मोठ्या असोन त्यांचा संचय होतो तो सर्व विलायतेस जातो. त्याचा आपले लोकांचे निर्वाहाचे कामीं कांहीं उपयोग होत नाहीं. या रकमेचा आकार करवत नाहीं, परंतु साधारण अजमास पुष्कळ विचारानें साडेपांच कोट रुपये धरला असतां ज्यास्ती धरल्याचा दोष येणार नाहीं.

एकंदर १६ कोटि रुपये यावरून असें दिसेल कीं, परदेशस्थ लोकांचें राज्य हिंदुस्थानांत असल्या कारणानें दरसाल १६ कोट रुपये विलायतेस खंडणी धाडावी लागते.

आपले नेटिव्ह राज्यकर्ते यांचें उत्पन्न दुसरीकडे कोठेंही जात नाहीं. तें सर्व आपले देशांतच राहतें. राजे लोकांनीं पैसा उधळला तरी त्याचा ज्या लोकांत व्यय झाला असतां पैशास बरकत येणार तशा लोकांत व्यय न होतां दरबारी लोक किंवा रांडा पोरें व भट भिक्षुक यांत उधळला जातो, तथापि हे लोक सधन झाल्यानें शेवटीं एकंदर देशांतील लोकांस रोजगार व आश्रय मिळण्याचे कामी ह्या पैशाचा विनियोग होतो.

वर जो तपशील सांगितला आहे त्याजवरून असे दिसेल कीं, हिंदुस्थानांत जो इंग्रज सरकारचा मुलूख आहे त्यांतील प्रजेपासून जें उत्पन्न होत आहे त्या उत्पन्नापैकीं आजमासें दोन हिस्से उत्पन्न येथें खर्च होतें, व एक हिस्सा म्हणजे १६ कोट रुपये विलायतेस जातात, आणि नेटिव राजे यांचे सरकार देणें त्यांच्या प्रजेस जरी ज्यास्ती पडतें, तथापि तो पैसा देशाचे बाहेर जात नसल्यामुळें त्या द्रव्याचा उपयोग दुसरे द्वारानें प्रजेस होतो, याजविषयीं कुटुंबाचा दृष्टांत वर सांगितला आहे त्याप्रमाणें नेटिव संस्थानाच्या प्रजेची इंग्रजी अमलातल्या प्रजेप्रमाणें नागवण होत नाहीं.

**(२)व्यापाराच्या संबंधानें या देशांतील संपत्तीची स्थिति.**

आपल्या देशाचा परदेशस्थ लोकांशीं व्यापार चालला आहे त्याचा तपशील खालीं लिहिला आहे. हल्लीं दहा पांच वर्षें हिंदुस्थानचा माल बाहेर जातो व हिंदुस्थानांत परदेशांतील माल येतो त्याची एकंदर बेरीज सरासरी शंभर कोट रुपये होत आहे. सन १८३४–३५ सालीं ही बेरीज सुमारें पंधरा कोट होती. तेव्हां पासून वाढत वाढत १८४८–४९ सालीं तीस कोट रुपये झाली. त्या पुढील दहा वर्षांत ६० कोट झाली. व त्याच्या पुढील दहा वर्षांत शंभर कोट होऊन बसली आहे. मध्यंतरी कापसाचे गर्दींत दोन सालें १२५ कोटी

पर्यंत आंकडा चढला होता. सन १८३४–३५ सालीं बाहेर मुलुखांतून पांच कोट रुपयांचा माल आपले देशांत आला. आणि आठ कोट रुपयांचा माल परदेशांत गेला. सन १८४८–४९ सालीं नऊ कोट रुपयांचा माल आपले देशांत बाहेरून आला, आणि पंधरा कोट रुपयांचा बाहेर गेला. सन १८५८–५९ सालीं १६ कोट रुपयांचा माल बाहेरून आला, आणि पंचवीस कोट रुपयांचा माल बाहेरगेला. पुढें १८६४–६५ व १८६५–६६ सालांत मिळोन ५८ कोट रुपयांचा माल आला. व १३३ कोट रुपयांचा माल गेला. आलीकडे १८६९–७० सालीं ३३ कोट रुपयांचा माल आला व ५३ कोट रुपयांचा माल बाहेर गेला असा अजमास आहे. सदरील तपशिलावरून जितका माल बाहेर जातो त्यापेक्षां माल बाहेरून देशांत कमी येतो अशी नेहेमी व्यवस्था आहे असें दिसून येईल. सदरील जें अंतर राहतें त्या ऐवजीं कांहीं रुपें व सोनें येतें त्याचा अजमास १८३४–३५ सालीं दोन कोट रुपयांचा होता तीन कोट रुपयांचें सोनें १८४८ ४९ सालीं आलें. मध्यें १८६५ व १८६६ सालीं सुमारें २५ पासून ३० कोटी रुपयांचें सोनें रुपें आलें. आलीकडे हें मान पुनः कमी म्हणजे सुमारें दहा कोट रुपये झालें आहे. याप्रमाणें व्यवस्था आहे.

विलायतेहून माल येतो त्याचा तपशील. कापड व सूत पूर्वी १८५०–५१ सालीं ५॥ कोट रुपयांचें आलें, १८६९–७० सालीं १३॥ कोट रुपयांचें आलें. लोंकरी व रेशमी कापड पूर्वीं १७५० ५१ सालीं ५० लाख रुपयांचें आलें. आलीकडे एक कोट रुपयांचें येतें. दारू वगैरे मादक जिन्नस ४० लाख रुपयांचा १८५० ५१ सालीं आला. हल्लीं एक कोट दहा लक्ष रुपयांचा माल येतो. कोळसे वगैरे सात लाख रुपयांचा माल १८५०–५१ सालीं आला. हल्लीं एक कोट रुपयांचा दरसाल सदर माल येतो. तांबें, पितळ लोखंड कच्चें व तयार केलेलें वगैरे दीड कोट रुपयांचे १८५०–५१ सालीं आलें हल्लीं तीन कोटी रुपयांचा सदर माल येतो. आगगा-

डीचे संबंधाचा माल सन १८५०–५१ सालापर्यंत काहीं येत नव्हता पण हल्लीं एक कोट रुपयांचा माल येतो. मीट पूर्वीं ४० लाख रुपयांचें येत होतें. हल्लीं ७० लाख रुपयांचें मीठ विलायतेहून येतें. पुस्तकें कागद वगैरे पूर्वीं १८५०–५१ सालीं १४ लाख रुपयांचा माल येत होता. हल्लीं ३० तीस लाख रुपयांचे सदर जिन्नस येतात. सदर्हूप्रमाणें या बाहेरून येणाऱ्या मालाचा तपशील आहे.

इकडून माल विलायतेस व अन्य देशीं जातो त्याचा तपशिलः— काफी, १८५०–५१ सालीं सहा लाख रुपयांची बाहेर गेली. हल्लीं ४० लाख रुपयांची काफी जाते. कापूस १८५०–५१ सालीं २ कोट रुपयांचा गेला. हल्लीं १५ कोट रुपयांचा कापूस जातो. नीळ पूर्वीं १॥ कोट रुपयांची जात असे. हल्लीं दोन कोट रुपयांची जाते. धान्य १३ लक्ष रुपयांचें जात होतें. हल्लीं सव्वा कोट रुपयांचें जातें. कातडीं पूर्वीं म्हणजे १८५०–५१ सालीं वीस लाख रुपयांचीं जात होतीं. हल्लीं सव्वा कोट रुपयांचीं जात आहेत. करडई वगैरे तेलाचे जिन्नस ४० लक्ष रुपयांचे जात होते. हल्लीं पावणे तीन कोटींचा सदर माल जातो. सोरा मीठ २० लक्ष रुपयांचे सन १८५०–५१ सालीं गेलें. हल्लीं २३ लाख रुपयांचें जातें. १३ लाख रुपयांच्या शाली सन १८५०–५१ सालीं गेल्या. हल्लीं ६० लाख रुपयांचा सदर माल जातो. रेशीम ६० लाख रुपयांचें १८५०–५१ सालीं गेले. हल्लीं एक कोट दहा लक्ष रुपयांचें जातें. साखर पूर्वीं पावणें दोन कोटींची जात होती. हल्लीं २४ लाख रुपयांची जाते. लोंकर पूर्वीं ६ लाख रुपयांची जात होती. हल्लीं ४० लाखांची जाते.

सदर्हू तपशिलावरून आपले देशाचा व्यापार वाढत आहे. असें सहज दिसून येईल. मात्र त्यांत दोष येवढाच आहे कीं, एकंदरींत कच्चा उत्पन्न झालेला माल इकडून फार जातो. व कलाकौशल्यानें तयार झालेला माल तिकडून फार येत आहे. ही सांप्रतची व्यापाराची स्थिति आहे.

वर जो सविस्तर तपशील दिला आहे त्यावरून दोन तीन गोष्टी सर्वांच्या ध्यानांत येतील त्या येणेंप्रमाणें.

१ परदेशस्थ लोकांचा अंमल हिंदुस्थानांत असल्यामुळें हिंदुस्थांतील लोकांच्या मेहेनतीनें उत्पन्न झालेले द्रव्यापैकीं १६ सोळा कोट रूपये दरसाल विलायतेस धाडावे लागतात. त्या ऐवजीं राजकीय दृष्टीनें स्वस्थता, व समर्थ देशाचा आश्रय आपणास मिळतो, या गोष्टी कबूल आहेत; परंतु व्यापाराच्या संबंधानें हल्लींचे प्रभु विलायतेस न राहता याच देशांत वस्ती करून सत्ता चालविते, तर वर सांगिल्याप्रमाणें १६ कोट रूपये दरसाल या देशांतून न जातां, त्यांतील दोन हिस्से तरी याच मुलखांतील लोकांस धंदे व रोजगार मिळण्याचें कामी खर्च झाले असते. आपल्या देशासारख्या दरिद्री देशांस दहापासून बारा कोटींचा रोजगार नवीन मिळाल्यास किती जीवन होणार आहे याची कल्पना सर्वांनीं करावी.

२ दुसरी गोष्ट अशी आहे कीं, विलायत व इतर देशाशीं आपला जो व्यापार चालतो त्या व्यापारांत साधारणपणें जितका माल या देशांतून बाहेर जातो त्याहून अधिक किंवा तितका तरी तिकडचा माल या देशांत यावा असा सिद्धांत असून, या देशाचे व्यापारांत या संबंधानें उलट व्यवस्था दिसून येते, म्हणजे इकडून माल जातो त्या ऐवजीं तितक्या किंमतीचा माल या देशांत येत नाहीं. मागील सालीं ५२ कोटींचा माल गेला त्याचे ऐवजीं ३२ कोटींचा माल देशांत आला. याप्रमाणें बहुतकरून प्रारंभापासून व्यवस्था आहे. अशी व्यापाराची स्थिति दुसरे देशाची नाहीं. मागील वीस वर्षांत आपला व्यापार पुष्कळ वाढला असून ह्या व्यवस्थेंत बदल झाली नाहीं. असा प्रकार जोंपर्यंत चालत आहे तोंपर्यंत व्यापारांत एकंदर देशास बरकत येण्यास अडचण आहे हें उघडच आहे.

३ विलायतेशीं आपला व्यापार चालतो त्या संबंधानें ध्यानांत ठेवण्याजोगी तिसरी गोष्ट आहे ती अशी कीं, पूर्वीं तपशिलवार कळविल्याप्रमाणें दिवसेंदिवस कच्चा माल आपल्या देशांतून ज्यास्ती जातो व

कलाकौशल्याच्या योगानें कमावून पक्का केलेला माल विलायतेहून आपले देशांत ज्यास्ती येतो, यामुळें या देशांतील कारागीर लोकांस उद्योग राहिला नाहीं असें झालें आहे. सर्वांची प्रवृत्ती विलायती जिनसाकडेस दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें स्वदेशीय जिनसांचा खप संसाराच्या सर्व कामांत कमी कमी होत आहे.

ह्या तीनही गोष्टी सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवण्याजोगया आहेत. अदमासें १६ कोट रुपये देशांतील संचयापैकीं विलायतेस दर साल जातात, त्या संबंधानें या देशास दरिद्र येईल किंवा नाहीं, याचा विचार क्षणभर करूं. हिंदुस्थानांतील इंग्रजी अंमलाखालच्या प्रजेची दर सालची प्राप्ति काय आहे याचें मान पाहूं गेलें असतां दर शेकडा एक रुपया इन्कम्‌टाकस् बसला असतां सुमारें एक कोट रुपये उत्पन्न होतात, असा अजमास इनकमटाक्स आज दहा बारा वर्षें या देशांत रूपांतरानें चालू आहे त्यावरून ठरविलेला आहे. ज्याअर्थीं एक कोट रुपयांचें उत्पन्न दर शेकडा एक रुपया कर घेतल्यानें होतें, त्याअर्थीं संचय करणारे लोकांची प्राप्ति शंभर कोट रुपये सुमारें होती असा निश्चय होतो. या कर देणाऱ्या प्रजेपाशींच संचय होण्याचा संभव आहे, कर न देणारे जे लोक आहेत त्यांच्या प्राप्तीचा सर्व व्यय चरितार्थाकडेसच होतो, यामुळें देशांतील संचयाच्या संबंधानें त्या लोकांविषयीं विशेष विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. आतां प्राप्तीचा अजमास सरकारी अंमलदारास बराबर लागत नसेल, कारण लोक आपलें उत्पन्न लबाडीनें कमी सांगतात, असें मानलें तरी दोनशें कोट रूपयांहून ज्यास्ती आपल्यांतील समर्थ व संचय करणारे लोकांची दर सालाची प्राप्ती नाहीं हें उघड सर्व कबूल करतील. आतां या दोनशें कोट रुपयांतून सर्व खर्चवेच वजा केला पाहिजे तेव्हां संचय किती होतो हें समजेल. आपले प्रत्येकाचे अनुभवावरून प्राप्तीच्या निमे मानानें खर्च करणारे कांहीं थोडे लोक आहेत ते खेरीज करून वरकडांचे प्राप्तीचा एक तृतीयांश संचय झाला असतां ते लोक आपल्यास मोठे

भाग्यशाली मानतात. तसें मान धरलें असतां सुमारें साठ पासष्ट कोट रुपये आपल्यांतील समर्थ लोकांचा संचय आहे, ह्मणजे इंग्रजी अंमलाखालील एकंदर देशांतील संचय दरसाल साठ पासष्ट कोट रुपये होतो, असें म्हटलें असतां चालेल. आतां सरकारी वसुलाची बेरीज चाळीस पंचेचाळीस कोटी आहे ती सर्व संचय करणारांपासूनच सरकार उत्पन्न करितें असें नाहीं. त्यांतील दोन हिस्से वसूल गरीब प्रजेपासूनच प्राप्त होतो, तथापि तूर्त प्रसंगीं कराचें ओझें हलकें किंवा जबर आहे हा विचार नाहीं, एकंदर संचयाच्या संबंधानें विलायतेस जी खंडणी धाडावी लागते तिचें प्रमाण किती आहे हें पाहणें आहे. त्या मानानें पाहतां देशांतील जो निवळ संचय आहे त्याचा चवथा हिस्सा दरसाल विलायतेस जातो. म्हणजे आपले देशांतील लोकांनीं केलेल्या संचयांतील बारा आणे येथें राहतात, आणि चार आणे विलायतेस जातात. या चार आणे संचयाचा विनियोग याच देशांतील लोकांस रोजगार मिळण्याचे कामीं झाला तर किती लोकांचें पोषण होईल याची कल्पना सर्व लोकांनीं करावी. वर कुटुंबाचा दृष्टांत घेतला आहे. त्यास कुटुंबांतील म्हातारे व निकामी आईबापानीं अगर बायका मुलांनीं आपले कष्टार्जित द्रव्यापैकीं दर रुपयास सहा आणे खाऊन भस्म करावेत हें बरें, किंवा तीं सर्व माणसें आपण हाकून लावलीं, व त्यां ऐवजीं दर रुपयास चार आणे प्रमाणें कुटुंबाखेरीज तिऱ्हाइतास आपण खंड द्यावा असें ठरल्यास तें बरें? कुटुंबाचे एकंदर सुखास कोणती गोष्ट विशेष अनुकूळ किंवा प्रतिकूळ आहे हें सर्वत्रांनीं पाहावें. देशांतील उद्योगास बरकत कां नाहीं, सर्व लोक जिग जिग झालेले कां दिसतात, याचें कारण कोणीं विचारील तर या देशांतील संपत्तीचे वृद्धीस मोठा क्षार लागला आहे, तेणेंकरून आपल्या कष्टसाध्य सामर्थ्याचें पाणी होऊन दिवसें दिवस आपणास अशक्तता वाटते. ही अशक्तता एकंदरींत आपल्यास सुखकारक पुढें होणार असेल. परंतु व्यवहार दृष्टया पाहिलें तर, जसें भांड्याच्या बुडीं मोठे छिद्र राखून आपण कितीही पाणी ओतलें तथापि भांडे भरून येणार

स्टे. नि. ३८९



नाहीं, त्याचप्रमाणें देशांतील लोकांचा इतका उद्योग वाढला असून देशाचे सामर्थ्य दिवसें दिवस शुष्क कां होत चाललें आहे, याचा विशेष चमत्कार कोणास वाटण्याचें कारण नाहीं.

असो, आपल्या इच्छेविरहित या देशांतील संचयाचा जो भाग विलायतेस परदेशस्थ लोकांच्या अमलाच्या संबंधानें जातो तो कमी करणें आपल्या स्वाधीनचें नाहीं. येवढें जबर ओझें आपणास दरसाल वाहून वेठ वारावी लागते, तेणेंकरून आपल्या दृष्टीस अदृश्य असे अनेक लाभ होत असतील, त्याबद्दल तूर्त इतकाच विचार तहकूब ठेवून आपल्या देशाच्या संपत्तीस क्षयकारक असा दुसरा प्रकार आपल्या सर्वत्रांचे देखत सर्वत्रांच्या हातून घडत आहेत त्याचा विचार करणें विशेष जरूरीचे आहे. तो प्रकार असा घडून येतो. जो संचय साठ पांसष्ट कोटी रुपयांचा दरसाल होतो ह्मणोन वर सांगितलें त्याच्या प्रमाणानें विलायतेस चवथ्या हिशाची खंडणी जाते, ती खेरीज करून दुसरी खंडणी आपण समुद्रास देतों, ह्मणजे एकंदर संचयापैकीं सुमारें अठवा हिस्सा आपण पाण्यांत नेऊन बुडवितों. हें बोलणें कोणाला अतिशयोक्तीचें वाटेल, परंतु यांत अतिशयोक्ति नाहीं. दरसाल आपणामध्यें जेवढी संचय करणारी प्रजा आहे तिच्या हातून हा अनर्थ घडत आहे. याचा प्रकार येणेंप्रमाणें:—

या देशांत सोनें व रुपें पर मुलखांतून आलें, व आपल्या देशांतून बाहेर गेलें, याबद्दल सन १८६० पासून सन १८७० पर्यंत तपशिल पुढें लिहिल्याप्रमाणें कळून येतो:—

| साल. | या देशांत सोनें व रूपें आलें त्याचा अकार. | | या देशांतून सोनें व रूपें बाहेर गेलें त्याचा आकार. | |
|---|---|---|---|---|
| | सोनें. कोटी. | रूपें. कोटी. | सोनें. लाख. | रूपें. लाख. |
| १८६१ | ४ | ६ १/३ | १ | ११० |
| १८६२ | ५ १/५ | ९ ३/४ | १/२ | ६७ १/२ |
| १८६३ | ७ | ७ ३/४ | ३ १/३ | १०७ |
| १८६४ | ८ १/१० | १४ | २ ३/४ | १२४ |
| १८६५ | ९ १/१० | ११ १/२ | ३ १/२ | १४१ |
| १८६६ | ६ ३/४ | २० १/५ | ६४ १/२ | १५४ |
| १८६७ | ४ २/३ | ८ २/३ | ७४ | १७१ |
| १८६८ | ४ ३/४ | ७ | १६ | १३७ |
| १८६९ | ४ १/६ | १० | १२ | १३७ |
| १८७० | ५ १/२ | ८ १/२ | १२ | ८२ |
| एकूण. | ६० कोटी. | १०५ कोटी | १०९ लाख. | १२१५लाख. |

याची एकंदरींत बेरीज करितां सरकारी व खासगी व्यापाराचे संबंधानें मागील दहा वर्षांत १६५ कोट रूपयांचें सोनें व रूपें या देशांत आलें, व या देशांतून सुमारें १२ कोट रूपयांचें सोनें व रूपें बाहेर गेलें. बाकी सुमारें दीडशें कोटी रूपयांचें सोनें व रूपें शिलक राहिले तें दहा वर्षांमध्यें वाटलें तर दरसाल १५ कोट रूपयांचें सोनें व रूपें या देशांतच राहिले असें कळून येतें. त्यापैकीं सरकारी नाण्याकरितां सोनें व रूपें किती खर्च झालें याचा तपास पाहतां सरकारी टंकसाळींत सोनें, रूपें व तांबें यांचें नाणें मागील नऊ वर्षांत पाडलें त्याचा आकार.

| साल. | सरकारी टंकसाळींत नाणे पाडण्यास सोनें, रुपें व तांबें दिलें तें. | | | |
|---|---|---|---|---|
| | सोनें. लाख. | रुपें. कोटी. | तांबें. लाख. | एकून. कोटी. |
| १८६१ | ७ | ५ १/५ | २४ | ५ १/२ |
| १८६२ | ६ | ७ | १५ | ७ १/२ |
| १८६३ | १३ | ९ | १५ | ९ १/२ |
| १८६४ | ५ ३/२ | ११ | २९ | ११ ४/५ |
| १८६५ | ९ १/२ | १० | २३ | १० ४/५ |
| १८६६ | १ ३/४ | ६ १/५ | १४ | ६ १/३ |
| १८६७ | २ ३/४ | ६ १/५ | १४ | ६ १/६ |
| १८६८ | २ | ४ २/५ | २ १/२ | ४ १/२ |
| १८६९ | २ १/२ | ५ १/३ | ९ | ५ १/२ |
| एकून. | ४० लाख. | ७५ कोटी. | १५८ लाख. | ७७ कोटी. |

सन १८७०–७१ सालाबद्दलची माहिती मिळाली नाहीं, परंतु ह्या सालाबद्दल वरील नऊ सालांचे सरासरीनें प्रमाण धरलें असतां सुमारें ऐशीं कोट रुपयांचें सोनें, रुपें, व तांबें, दहा सालांत नाणें पाडण्याचे कामीं गुंतलें गेलें. एकंदर १६५ कोट रुपयांचें सोनें व रुपें देशांत दहा वर्षांत आलें, त्यापैकीं पंधरा कोटी रुपयांचें सोनें व रुपें बाहेर गेलें, तें वजा करून बाकी १५० कोटि देशांत शिल्लक राहिल्यापैकीं सुमारें निमे सोनें व रुपें नाणें पाडण्याचे कामीं गुंतलें, ह्मणजे पैशाची चलन होऊन व्यवहारांत शिरलें. बाकी ७५ कोट रुपयांचें सोनें व रुपें काय झालें याचा जर कोणीं बारीक रीतीनें शोध करील तर त्यास ह्या गोष्टीचा आचंबा वाटल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थान देश खेरीज करून बाकी मुलखांतील व्यवस्था अशी आहे कीं, जेवढें सोनें व रुपें नाणें पाडण्याचे कामीं लागतें, तसेच किरकोळ कलाबुत वगैरे व्यापारास लागतें, तें खेरीज करून बाकी

सोन्यारुप्याचा खप या देशांत होत नाहीं. त्याचा लागलाच व्यवहारांत उपयोग होऊन इतर द्रव्याचें त्यास रूपांतर मिळून देशांत रोजगार धंदे वाढण्याचे कामीं तें उपयोगी पडतें, तशी या देशाची स्थिति नाहीं. येथें विलायतेची वरात संभाळून जें सोनें रुपें देशांत येतें, तें या देशांत आलें ह्मणजे निंमे सरकारी टंकसाळींत जाऊन नाणें बनतें, व बाकी निंमे देशांतच मुरतें ह्मणजे भुईंत गढून जातें. लोक आपल्या बायका मुलांचे अंगावर त्याचे दागिने बनवून तें सोनें रुपें जशी तापलेली भूमी पाणी शोषून घेते त्याप्रमाणें अंगावर झिजवितात. त्यास एकदां दागिन्याचें रूप पावलें ह्मणजे व्यापाराचे कामीं त्याचा तादृश उपयोग होत नाहीं. मालकावर प्रसंग आला असतां तें बाहेर येतें, परंतु बहुशा लाख व झीज यांचे योगानें सर्वस्वी लय होईपर्यंत त्याचें रूप बदलत नाहीं. परदेशास मागील दहा वर्षांत या देशांतून माल धाडला गेला त्याचे ऐवजीं देशांत बाहेरून माल आला तो वजा जातां बाकी जी तूट राहते त्याबद्दल पूर्वी तपशील सांगितला आहे. त्या तुटीपैकीं जितकें सोनें रुपें येतें त्याची व्यवस्था आपले देशांत आल्यावर काय होते हें आतांच दाखविलें आहे. ह्मणजे जें सोनें रुपें येतें तें निंमे नाणें बनून चलन होतें, व बाकीचें निंमे ह्मणजे सुमारें सात पासून आठ कोट रुपये दर वर्षांस मातींत मिसळतात, म्हणजे लोक त्याचा व्यापाराचे कामीं उपयोग न करितां दागिने वगैरे करून आपला संचय सर्वथा व्यापाराचे कामीं पडूं नये अशी त्याची व्यवस्था करितात. आधींच आपला संचय थोडा, त्यांत विलायतेकडे १६ कोट रुपये खंडणी धाडावी लागते. शिवाय आपल्या लोकांच्या मूर्ख समजुतीमुळें व एकमेकांच्या अविश्वासामुळें या अत्यल्प संचयापैकीं सुमारें आठ कोट रुपये दागिन्याच्या रूपानें मातींत मिसळले जातात. मिळून रोजगार धंद्याचे कामीं उपयोग होण्याची पात्रता ज्या संचित द्रव्याचे ठायीं आहे अशा द्रव्याचा वर सांगितल्याप्रमाणें विनियोग होऊन देश निर्द्रव्य होत आहे, या गोष्टीचा सर्वत्रांनीं विचार करावा कारण ही

दुसरी गोष्ट सर्वत्राच्या स्वाधीनची आहे. जो आपले गांठीशीं संचय बांधला त्याचा देशांतील उदीम व्यापार वाढविण्याचे कामीं उपयोग न करितां तो भुईंत पुरून ठेविला, अगर अंगावर दागिने करून झिजविला, अथवा लाखेचा डाग लावून नासून टाकिला, तर तेणेंकरून तितकें द्रव्य दरसाल समुद्रांत बुडविल्यासारखें आहे. ज्या देशांत संचय मोठा होतो तेथें असा प्रकार थोडा बहुत असल्यानें विशेष हानी होत नाहीं. परंतु आपल्या सारख्या दरिद्री देशांत परदेशस्थ लोकांच्या अमलामुळें व आपल्या गैरसमजुतीच्या वर्तनामुळें सरसाल पंचवीस कोटींची नागवण होत आहे, याचा सर्वत्रांनीं आपल्या योग्यतेप्रमाणें विचार करावा.

वर तपशिलवार सांगितल्याप्रमाणें ज्याचे मनांत विचार ठरतील, त्यास दिवसें दिवस लोकविशेष खपत असून लोकांची स्थिती इतकी निःसत्व कां दिसते याचें खरें कारण सहज कळून येईल. देशांतील संपत्ति वाढण्यास देशाचा जो संचय रोजगार धंद्याच्या कामीं लागला जातो त्याची रक्कम वाढली पाहिजे. आपल्या देशाची कायमची स्थिति अशी होऊन गेली आहे कीं, मुळ उद्योग थोडा यामुळें संचय थोडा, त्या थोड्या संचयापैकीं परदेशस्थ अमलाच्या संबंधानें व लोकांच्या आळसामुळें व अविश्वासामुळें सर्व संचय रोजगार धंद्याचे कामीं लागत नाहीं. एकंदर दरसालच्या ७५ कोटी संचयापैकीं सुमोरें २९ कोटी रुपये संचित झाले नव्हते अशा व्यवस्थेप्रत पावतात. अर्थांतच हा जो मोठा पाझर लागला आहे त्याच्या योगानें आपल्या सर्व राष्ट्ररूप शरीरांत अवसान कांहीं राहिलें नाहीं असें झालें आहे. मोठा जवान माणूस असला, आणि त्याचे डोक्यावर त्यास न तोलणारें वजन दिलें, व त्याचे पायांत वजनाच्या बिड्या घातल्या व त्यास उंच डोंगरावर चढण्यास लावलें रत त्याचें सामर्थ्य दिवसें दिवस कमी होईल यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

तथापि याही प्रसंगीं हिम्मत सोडून उपयोग नाहीं. चार हजार वर्षांपसून हा देश हल्लींचे प्रसंगापेक्षांही दुर्धर प्रसंग अनुभवून पृथ्वीचे पाठीवर कायम राहिला आहे. तेव्हां आपल्या जीवनाचीं मुळें

फार खोल गेलीं आहेत यांत संशय नाहीं. इतक्या ओझ्यानिशीं व या विड्यातूनही अपली सुटका होईल या गोष्टीची सर्वत्रांनीं खात्री बाळगून झटावें.

आपल्या समक्ष फ्रान्स देशाच्या बादशहाच्या चुकीनें व मूर्खपणानें त्या देशावर एका सहा महिन्यांत सुमारें ५०० कोट रुपयांचें कर्जाचें ओझें बसलें. ज्या शत्रूनीं त्यांस जिंकलें त्यांचे दंडाबद्दल २०० कोट सुमारें रुपये देणें ठरलें. शिवाय लढाई संबंधीं खर्च फ्रेन्च लोकांस झाला होता तो अंगांवर पडला. तथापि लढाई संपल्या नंतर त्या लोकांनीं हिम्मत न सोडतां सर्व प्रपंचातील विनाकारण खर्च बेतावर धरून शत्रूचे दंडाचें माप भरलें. त्यामुळें दरसाल त्या देशांतील प्रजेस सुमारें तीस कोट रुपयांचें नवीन करांचे ओझें व्याजा ऐवजी सोसावें लागेल. फ्रान्स देशावर हा जो एकाएकी दुर्धर प्रसंग आला त्याच योग्यतेचा आपणावर नेहेमीचा प्रसंग आला आहे. परदेशस्थ अंमलाच्या संबंधानें आपणास जी खंडणी द्यावी लागते ती खंडणी तूर्त कमी होण्याचे अगर चुकण्याचे विचार फार दूर आहेत. तेव्हां तें ओझें आपल्या शिरावर नेहेमी आहे असें धरून सर्व प्रयत्न झाले पाहिजेत.

त्यास ज्याप्रमाणें फ्रान्स देशांतील लोकांनीं हिंम्मत धरून आपल्यावर आलेला प्रसंग विनाकारण मिजाशीचे खर्च जेवढे कमी होतील तेवढे कमी करून टाळला, व सरकारी सारा दुप्पट तिप्पट वाढला तेवढा देण्या विषयीं कंबर बांधली, त्याच हिम्मतीनें आपणही आपले निष्कारणी खर्च कमी करून संचय विशेष वाढवावा, व तो संचय आपल्या लोकांस जेणें करून रोजगार धंदा लागेल अशा उद्योगांत लावण्याची तजवीज सर्वदां करावी.

आपण सर्वत्र सरकारानीं एखादे सालीं ज्यास्त कर वाढविला तर तो कर बिनबोभाट देतों, व आपला इतर खर्च असतो तो कमी करितों, तद्वतच आपल्यावर नकळत हा जो खंडणीचा दंड पडत आहे त्याविषयीं ही तजवीज ठेविली पाहिजे. आपला विनाकारण जो

खर्च होतो त्यांतील बचत करून आपण बाहेर देशास खंडणी पाठवितो त्या मानाः इतका संचय वाढविल्यास आपण खंडणी दिली तरी न दिल्याप्रमाणें होणार आहे. संचयाचा विचार प्राप्ति व खर्च यांच्या संबंधानें कमी ज्यास्त प्रमाणाचा आहे. तेव्हां प्रथम सर्वत्रानीं हें संचयाचे एकंदर मान स्वदेशीय राजांचा अंमल असता तर जेवढें असतें त्या प्रमाणावर आणून ठेवण्याविषयीं झटलें पाहिजे. ह्मणजे गी पंधरा कोटींची आपणास द्यावी लागते ती देऊन संचय पूर्वी गला पाहिजे. अर्थात् निष्कारणी खर्च कमी करून संचय वाढविला पाहिजे, अथवा अन्य रीतीनें सर्वांनीं मितव्यय केला पाहिजे, म्हणजे आपोआप संचय वाढेल, व त्याचे पायीं सर्व कांहीं होईल.

आपल्याजवळ शंभर रुपये असल्यास त्यांचा सहा प्रकारांनीं विनियोग करितां येईल. एक ते रुपये नेऊन गंगेत बुडविले असतां नाहींसे होतात. अथवा रुपये आपल्याजवळ पेटींत अगर गाडग्यांत पुरून ठेविले तरी कित्येकांस त्याची ऊब वाटून अगर दृष्टीनें पाहून आनंद होतो. अथवा आंगावर सोन्या रुप्याचे दागिनें करून घातले तरी नेत्रांस सुख होईल, अथवा देहास शोभा येईल. अथवा त्या रुपयांची मेवा मिठाई किंवा मिजाशीचे पदार्थ विकत घेऊन त्यांचा आपण उपभोग घेतला तरी इंद्रियांस सुख होणार आहे. किंवा दहा माणसें चाकरीस ठेवून एकाकडून हात चेपून घेतले, एका कडून वारा घालविला, एकाकडून गाणें गावविलें, तरी एक प्रकारचें सुख आहे. शेवटीं सदर रुपयांचा उपयोग नफा येणाऱ्या व्यापार धंद्यांत करून पुनः रुपयांचे रुपये व्याजासहित परत येण्याची तजवीज करण्यास ही आपण मुकत्यार आहोंत.

वरील सहा प्रकारांपैकीं संचयाचा उपयोग शेवटचे रीतीनें ज्या मुलखांत विशेष होतो तो देश लवकर संपत्तिमान् होतो. जेथें पूर्वीचे प्रकारांपैकीं अनुक्रमाप्रमाणें प्रकार ज्यारी असतात तेथें त्याच मानानें संपत्तीचा पायही मागें येतो

संचय होतो त्याचा खरा मितव्यय करणें असेल तर जेणेंकरून संचित झालेलें द्रव्य रूपांतर व वृद्धि पावून पुन: परत आपल्या हातीं येईल अशी तजवीज झाली पाहिजे. सर्व जातीचें द्रव्य आपले जिवाशीं वाळगून ठेविलें असतां माती होते, हा विचार सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवावा.

सदरील कारणाकरितां हल्लींचे स्थितींत आपण सर्वत्रांनीं मितव्यय केला पाहिजे. ह्मणजे पहिले पाच प्रकारचा व्यय जितका कमी होईल तितका करून सहाव्या प्रकारचा व्यय वाढविला पाहिजे. साधारण मितव्यय केला पाहिजे असें ह्मटल्यानें पैसा हातचा सोडूंनये अशी भ्रांति वेळेस होण्याचा संभव आहे, ह्मणून इतकें स्पष्टीकरण करून दाखविणें जरूर पडलें.

( पहिलें व्याख्यान समाप्त. )

---

## व्याख्यान दुसरें.

रावबाहादुर महादेव गोविंद रानडे ह्यानीं गेले फेब्रुवारी महिन्याचे बाविसावे तारखेस विश्रामबागचे वाड्यांत " हिंदुस्थानाच्या व्यापाराची स्थिति " ह्या विषयावर दिलेलें व्याख्यान.—

मागील एका प्रसंगीं या देशावर परस्थ लोकांचा अम्मल असल्यामुळें आपल्या देशांतील संपत्तीची व्यवस्था कशी होत आहे, आपल्या अल्प संचयांतून परस्थ अमलाच्या खंडणीच्या निर्वाहाबद्दल किती कोटि रुपये दरसाल आपणास दंड द्यावा लागतो, व त्या योगानें आपल्या संपत्तिचा व सामर्थ्याचा दिवसेंदिवस कसा ऱ्हास होत चालला आहे, या गोष्टींचें विवरण केलें. आपल्या सारख्या दरिद्री देशास सुमारें १२ पासून १५ कोटि रुपयांची खंडणी द्यावी लागते, हा विचार मनांत आला असतां वाईट वाटतें यांत नवल नाहीं. तथापि या संबंधानें एकदेशीय विचार मनांत आणून उपयोग नाहीं. परस्थ लोकांच्या अमलानें ज्याप्रमाणें ही जबर खंडणी आपणास दरसाल देणें पडते, त्याचप्रमाणें त्या लोकांचे साह्यानें आपण इतर मुलखांपासून सात आठ कोटी रुपयांची खंडणी घेतों, हा प्रकार विसरतां

कामा नये. आपणा सर्वत्रांस माहित असेल कीं, आपल्या देशांत जी अफू पिकते त्या अफूसारखी अफू पृथ्वीत होत नाहीं. निदान ती अफू चीनचे लोकांस फार आवडते. ह्या संबधानें जी कोट्यावधी रुपयांची अफू चीनचे बंदरांत आपण पाठवितों त्यावर फार जबर जकात सरकारची आहे, त्या जकातीचे रूपानें आपणास चीनचे लोक खंडणी देतात असें ह्मटलें असतां चालेल. पूर्वीं बादशाईत किंवा पेशवाईत हें उत्पन्न बिलकूल नसे, व आज सरकारांनीं ह्याविषयीं विशेष बंदोबस्त ठेविला नाहीं तर आपणास हें उत्पन्न मिळणार नाहीं. दरसाल अफूचें उत्पन्न खर्चवेंच जाऊन सात कोट सुमारें आपल्यास होतें. हा नफा हल्लींच्या प्रभूचे सत्तेनें आपणास होत आहे. याचप्रमाणें दुसरी एक गोष्ठ ध्यानांत ठेवण्याजोगी आहे ती ही कीं, ज्या परस्थ लोकांचा अंमल आपणावर आहे त्यां लोकांनीं पूर्वीं या देशांत जिन्नस पिकत नव्हते ते पिकविण्याचा उद्योग कोट्यावधी रुपये खर्च करून बहुत वर्षें सुरू केला आहे. पूर्वीं या देशांत चाहा ह्मणजे काय हें ठाऊक देखील नव्हतें. तसेंच काफी ह्मणजे बुंद हेंही आपणास ऐकून मात्र ठाऊक होतें. याचप्रमाणें निळीचा व्यापारही कमीच होता. हे तिन्ही उद्योग इंग्रज लोकांनीं फार वाढविले आहेत, आणि त्यायोगानें कोट्यावधी रुपयांचें उत्पन्न होत आहे. हें जिन्नस पिकविणारे बहुतेक साहेब लोक आहेत, ते या मुलखांत येऊन येथील जमिनींतून सदर जिन्नस पैदा करितात. त्याचें मान एका ठिकाणीं लिहिलें आहे तें येणेंप्रमाणें:—चाहा दहा वीस वर्षांपासून आसाम वगैरे हिमालयाचे पायथ्याचे प्रांतांत होतो, त्याचें सालीना पीक सुमार ५० लाख रुपयांच्या किंमतीचें होतें. व चाहा सुमारें एक कोट पौंड, म्हणजे पन्नास लाख शेर वजनाचा, उत्पन्न होतो. त्या उद्योगांत आपले मजूर लोक सुमारें सत्तर हजार लागले आहेत. याच मानानें काफी पूर्वीं १८५० सालीं सहा लाखांची बाहेर देशीं गेली. १८६८-६९ सालीं सत्तर लाखांची काफी बाहेर देशीं गेली. निळीविषयीं बंगाल प्रांतांत साहेब लोकांचें मोठे कारखाने पुष्कळ दिवसांपासून

ह्मणजे पाच पन्नास वर्षांपूर्वी पासून आहेत. हे सर्वांस ठाऊक आहेच १८५० सालीं दीड कोट रुपयांची नीळ बाहेर देशीं गेली. १८६९–७० सालीं दोन कोट रुपयांची नीळ बाहेर देशीं गेली. याशिवाय इतर किरकोळ जिन्नस पिकविण्याचे कारखाने साहेब लोकांनीं पदरचे पैसे लावून पुष्कळ काढिले आहेत. हे तीन जिन्नस मुख्य धरिले तरी चार पासून पांच कोट रुपये दरसाल साहेब लोकांचे या देशांत या कामीं गुंतले जातात. इतका नवीन रोजगार आपल्या लोकांस मिळतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या लोकांचा अम्मल या देशावर नसता तर हा लाभ आपणास होण्याचा संभव नव्हता. एकंदरींत परदेशस्थ लोकांच्या अमलाच्या संबंधानें आपणास जबर खंडणी देणें पडतें हें पाहून जितकें आपणास वाईट वाटतें, तितकें वाईट वाटण्यास कारण नाहीं. त्या ऐवजीं आपणास अन्य देशांतून त्याच आमलाच्या सत्तेनें लढाई न करितां खंडणी अंशत: येते, व आपल्या देशांत साहेब लोकांचे उद्योगानें रोजगार कोट्यावधी रुपयांचा मिळतो, हे विचार ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

ज्याप्रमाणें चाहा, काफी, नीळ, ह्यांचे कारखान्यांत साहेब लोकांचे पैसे असल्यामुळें आपल्या लोकांस नफा होतो म्हणून वर लिहिलें आहे, त्याचप्रमाणें जे सुमारें शंभर कोटी रुपये या देशांत आगगाडीचा रस्ता सुरू करण्याच्या कामीं साहेब लोकांचे खर्च झाले आहेत, त्या शंभर कोट रुपयांपासून आपला देश धनाढ्य झाला आहे अशी कित्येकांची समजूत आहे, त्यास असा प्रकार मात्र मनांत आणतां कामा नये. ज्या मंडळ्यांनीं हें आगगाडीचें काम उचालिलें आहे त्यांणीं जर आपल्या जोखीमीवर नफ्या तोट्यास जबाबदार होऊन या कामीं आपलें भांडवल घातलें असतें, तर त्यांणीं जे भांडवल खर्च केलें त्याचा आपणांस उपयोग पूर्वी लिहिल्याप्रमाणें झाला असता, प्रस्तुत व्यवस्था तशी नाहीं. आगगाडीच्या कामीं ज्या साहेब लोकांनीं पैसे खर्चले आहेत, त्या संबंधानें त्यांजवर जोखीम मुळींच नाहीं, कारण त्यांस सरकारांतून बहादुरी मिळाली आहे. त्या उद्योगांत नफा होवो न होवो, शेकडा

पांच रुपये व्याज पैसा भरल्यापासून त्यांस मिळेल असा सरकारांनीं त्यांजबरोबर करार केला आहे. आगगाडीचे कामीं जेवढा पैसा खर्च झाला आहे, तेवढा हिंदुस्थानांतील लोकांस उसनवार दिला आहे हें सर्वत्रांस ठाऊकच आहे, व त्या उसनवार पैशावर व्याजाचा पैसा पहिल्यापासून आजतलख आपण देत आहों. जे सुमारें नव्वद कोटी रुपये या कामीं रेलवे कंपन्यांनीं खर्च केले आहेत, त्यांपैकीं पस्तीस कोट रुपयांचा आपल्या लोकांस रोजगार पुरविण्याचे कामीं कांहींच उपयोग झाला नाहीं. ते पस्तीस कोट रुपये माल खरेदीकडे गेले, तो सर्व माल विलायतेस खरेदी झाला. त्या माल खरेदीच्या रकमेवर आपणांस व्याज मात्र देणें पडतें. हे पस्तीस कोट रुपये वजा केले असतां बाकी ५५ कोट रुपये या मुलखांत लोकांस उद्योग मिळवून देण्याच्या कामीं खर्च झाले. एकदम प्रथम आगगाडीच्या रस्त्याचें काम सुरू झालें म्हणजे दोन दिवस रोजगारास तेजी येते, तेवढा नफा खेरीज करून बाकी कायमचा नफा आपल्या लोकांस आज तागाईत किती झाला हें पाहिलें असतां, असें दिसून येतें कीं, आगगाडी सुरू झाल्यापासून ते आज तागाईत उत्पन्न झालेलें जमेस धरून शिवाय रेलवे कंपनींतील भागीदार लोकांस हिंदुस्थान सरकारानें सुमारें २० कोट रुपये व्याजा पोटीं भरले आहेत. म्हणजे आगगाडी सुरू झाल्यास सुमारें वीस वर्षे झालीं, येवढ्या अवकाशांत वीस कोट रुपये, जे पंचावन्न कोटी रुपये आगगाडीचा रस्ता चालू करण्याचे कामीं या देशांत खर्च झाले, व ज्यांचा मात्र या देशांतील लोकांस रोजगार मिळवून देण्याच्याकीमा उपयोग झाला, त्यांच्या व्याजा ऐवजीं भरावे लागले. अशाच रीतीनें पांच फूट सहा इंच रुंदीच्या जेवढ्या लाईनी आहेत, ह्मणजे बहुत करून सर्व प्रस्तुतचे चालू असलेले रस्ते यांची व्यवस्था आणखी वीस वर्षे अशीच चालल्यास आलीकडे दरसाल दहा पांच वर्षे ज्याप्रमाणें दीड पासून दोन कोटी रुपयांची तुट भरावी लागते, त्याप्रमाणें आपणास भरणें पडेल, ह्मणजे एकंदरींत चाळीस वर्षांचे आंत ह्या तुटीची रक्कम

भांडवला येवढी होणार आहे. आगगाडीच्या संबंधानें हा विचार सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवणें जरूर आहे. आगगाडीचे रस्ते चालू करण्याचे कामीं १८७१ अखेर ९० कोट रुपये खर्च झाले होते. जे नव्वद कोट रुपये खर्च झाले, ते नव्वद कोट रुपये खर्चून बांधलेल्या लाईनीचें उत्पन्न १८७१ सालीं ६ कोट १४ लाख रुपये झालें. १८७० सालीं सहा कोट तीन लाख रुपये उत्पन्न झालें होतें. या पैकीं निम्मेहून अधिक म्हणजे तीन पासून चार कोटी रुपये आगगाडी चालू ठेवण्याचे कामीं दरसाल खर्च होतात. बाकी निवळ नफा राहतो तो ९० कोटींच्या मानानें शेकडा तीन रुपये प्रमाणें देखील पडत नाहीं. म्हणून सरकार तिजोरींतून दीडपासून दोन कोटि रुपये दरसाल भरतीस घालावे लागतात. असा अतोनात खर्च दुसऱ्या कोणत्याही येवढ्या मोठ्या कारखान्यांत होत नसेल. अशा रीतीनें चाललेल्या कारखान्याचा आपल्या देशांतील रोजमाराच्या संबंधानें कितपत उपयोग आहे हें सर्वत्रांचे ध्यानांत येईल.

वर तपशिलवार जो प्रकार लिहिला आहे त्यावरून परस्थ लोकांची सत्ता या देशावर असल्यानें येथील व्यापारांस जी खंडणी द्यावी लागते, व त्यांचे ऐवजीं जो आपणास अंशत: मोबदला मिळतो, त्याचें स्वरूप सर्वत्रांचें ध्यानांत येईल. या एकंदर विचाराचें पर्यवसान पुर्णपणें ज्याचे लक्षांत येईल त्यास हा देश परस्थ लोकांच्या अंमलाखालीं असल्यानें आपल्या व्यापाराची सर्वस्वीं हानी आहे, किंवा आपला सर्वस्वीं लाभ आहे, अशा ज्या बहुतेक लोकांच्या एकदेशीय समजूती असतात, त्यांत तथ्यांश किती मानानें आहे हें कळून येईल. राज्यसत्तेच्या संबंधानें आपण एका दूर द्वीपस्थप्रभूची प्रजा झालों आहों. परंतु त्याच सत्तेच्या आश्रयानें व्यापाराच्या कामीं आपला निकट संबंध सर्व पृथ्वींतील देशांबरोबर दिवसेंदिवस वाढत चालला आहे, यामुळें आपल्या देशाची खरी योग्यता केव्हांना केव्हां तरी फळास येईल. आज इतके दिवस पृथ्वींतील सर्व लोकांपैकीं अशी धनाढ्य लोकांशीं राज्य सत्तेच्या व व्यापाराच्या संबंधानें आपली सांगड असतांना आपली दशा इत-

कीं दीनकां असावी याविषयीं प्रसंगवशात् आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. तथापि थोराची संगत सर्वकाळ गरिबास धनिक करिते असें घडत नाहीं. आपण क्षणभर जर सर्वत्रांनीं अशी कल्पना केली कीं, आपण जेवढे पुण्यांत प्रमुख लोक राहतों हे सर्व इनामदार असून आपलीं इनामें दूर कोंकणांत आहेत, तेथें आपण कारकून पाठवून मक्तयानें सर्व वसूल करून तो वसूल तिकडून इकडे आणून या शहरांत आपल्या प्रपंचांत व इषकबाजींत खर्च करितों. आपण कधीं आपल्या इनाम गावीं जात नाहीं, वसूल मात्र येथें आणून मोठे वाडे बागबगीचे बांधून सुख भोगितों. अशी क्षणभर कल्पना केली असतां ह्या गोष्टीचा समज कांहीं अंशीं होईल. अशी कल्पना करण्यास विशेष अडचण ही नाहीं, कारण स्वकीय अमलांत या शहराची स्थिति याच तऱ्हेची होती, व हल्लींही याच संबंधानें या शहरास जुन्या रीतीची कांहीं शोभा आहे. तेव्हां अशी जर कल्पना केली तर आपण इनामदार श्रीमंत आहोंत, या संबंधानें आपल्या इनाम गांवांतील रयतही सुखी असावी असें होत नाहीं, ज्यांचीं इनामें व शेतभाती मावळांत व कोंकणांत आहेत, त्यांची व मावळांतील आणि कोंकणांतील रयतेची स्थिति त्यांनीं लक्षांत आणली ह्मणजे उलट या दोन्ही गोष्टींत व्युत्क्रम प्रमाण असतें हें त्यांस उघड दिसून येईल. तसेंच हिंदुस्थानचें राज्य हें साहेब लोकांस इनाम आहे. ते श्रीमंत आहेत ह्मणून आपणही त्यांचे सुखाचे विभागी असावें असें अवश्य होत नाहीं. दुःखांत सुख येवढेंच आहे कीं, जसा एकादा इनामदार आपल्या इनाम गांवांत देऊळ बांधतो, किंवा नदीला धरण बांधितो, किंवा विहीर खणतो, अगर चावडी बांधतो, त्या योगानें त्याच्या गांवची प्रजा त्याचा धर्म अगर हौस पाहून जशी खुष असते, तद्वत जो थोडा बहुत अंश विलायतेंतील संपत्तीचा पाझरत इकडे येतो, त्याच्या ओलाव्यानें आपलें जीवन होत आहे. ह्मणून आपण खुष असावें, व तें जीवन वाढविण्याचा नेहमी आपला उद्योग चालू असावा.

याप्रमाणें हा विचार आहे. आतां आपल्या लोकांचें हे भाग्य

मोठें आहे कीं, परमेश्वर कृपेनें ज्या भूमीमातेच्या ओट्यांत आपण पडलों आहों तिची समृद्धि व फलद्रुपता अशा मानाची आहे कीं, सर्व पृथ्वींतील हवा, पाणी व जमीन आपल्या मुलखांत आहे, सर्व देशांतील झाडें, वनस्पती, औषधें, द्रव्यें, धान्यें, आपल्या जमिनींत विपुल व सहज पिकतात, असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थानाच्या व्यापाराच्या संबंधानें या गोष्टींचा विचार विशेष रीतीनें मनांत ठसतो. येथील प्रजा दुर्बल, दुर्भिक्षानें पिडलेली, यंत्रांची साधनें वगैरे माहीत नाहींत, उद्योग नाहीं, संपत्ती नाहीं, संचयाविषयीं वासना नाहीं, अशा प्रजेच्या हातून पृथ्वींतील अन्य देशांबरोबर आपल्या देशाचा टिकाव कसा लागेल ही नेहमी भीति मनांत वाटते. त्या भीतीचें निराकरण परमेश्वरानें आपल्या जनकभूमिमातेचे अंगीं जी विलक्षण कामधेनुसारखी सिद्धी दिली आहे त्या सिद्धीच्या योगानें होतें. ज्या ज्या वेळीं व्यापाराच्या संबंधानें एखाद्या उपयोगीं व्यवहारांतील जिनसाची तूट अन्य देशीं पडण्याचा प्रसंग आला, त्या त्या वेळीं आपला देश पुढें होऊन आपणासारख्या दुर्बळ लोकांचे प्रयत्नानेंही ती तूट भरून आली येवढेंच नाहीं, परंतु ज्या देशांत ती तूट झाली त्या देशांवर त्या पदार्थांच्या संबंधानें जो आपला पगडा बसला तो पुढें पहिली अडचण संपली असतांही आपण सोडला नाहीं. ह्यांत कोणास अतिशयोक्ति वाटेल तर अतिशयोक्तीचा कांहीं प्रकार नाहीं. मागील वीस वर्षांत असे चार प्रसंग भिन्न काळीं भिन्न देशाच्या संबंधानें आले, त्या चारी प्रसंगीं आपल्या देशानें पुढें होऊन प्रसंगीं पुरवटा केला येवढेंच नाहीं, परंतु पुढें नेहमीचीच किफायत आपली करून दिली. अशी समृद्धि व असें वैभव दुसऱ्या कोणत्याही देशाच्याअंगीं नाहीं. मनुष्यकृतीनें, व महत्प्रयासानें कष्टसाध्य गोष्टी आपल्यापेक्षां बहुत पटीनें जास्त इतर देशांत होतात. परंतु आपले देशाचें जे सामर्थ्य वर वर्णिलें, व ज्याची तपशीलवार हकीगत पुढें सांगतों, तें आपल्या देशासच भूषण होऊन राहिलें आहे. मागील वीस वर्षांत ह्या देशांत काफीची व चाहाची लागवड सुरू झाली. मागील वीस वर्षांत जे-

व्हां प्रथम रूस देशाशीं इंग्रज लोकांची लढाई सुरू झाली, तेव्हां त्या देशांतून विलायतेस ताग व ज्यूट व जवस वगैरे जात होते ते बंद झाले. ती संधी आपल्या देशानें पाहून एक हात पुढें केला तेणें करून विलायतेंत पडलेली तूट भरून आली एवढेंच नाहीं, परंतु पुढें लढाई संपल्यावरही रूस देशांतील मालास कोणी हातांत धरीनासा झाला. त्याचप्रमाणें अमेरिकेशीं लढाई सुरू झाल्यावेळीं अमेरिकेतून उत्तम क्यारोलिना तांदूळ परदेशांत जात असे तो बंद झाला. त्या वेळीं पेगु व ब्रह्मदेश व बंगाल या प्रांतांतील तांदुळांनीं जो पुरवठा केला तो अशा तऱ्हेनें केला कीं, लढाई संपली तरी इकडच्या तांदुळांची चाहा दिवसेंदिवस वाढून माल ज्यास्ती बाहेर जाऊं लागला. त्याचप्रमाणें सर्वत्रांस विदित आहे अशा तऱ्हेच्या कापसाचा व्यापार अमेरिकेंतील लढाईच्या संबंधानें विशेष उदयास आला. त्यानें हल्लीं लढाई संपली तरी पिछेहाट वजनाच्या संबंधानें ह्मणण्यासारखी घेतली नाहीं. याच मानानें लोकरीच्या व्यापाराचा ही विचार आहे. प्रत्येक जिनसांच्या व्यापाराचा उदय व वृद्धि कशी झाली ह्याबद्दल तपशिलवार हकीगत संक्षिप्त रीतीनें पुढें सांगतों.

१८५० सालीं बाहेर देशाशीं ज्या जिनसाचा आपला मुख्य व्यापार होत होता तें मान मनांत घेऊन त्या नंतर आलीकडे वीस वर्षांत जो प्रत्येक जिनसाचे संबंधानें फरक पडला आहे तो फरक ज्या ज्या संबंधानें पडला ते संबंध समजणें म्हणजे देशाचा इतिहासच ठाऊक असला पाहिजे. तितक्या तपशिलानें माहिती देण्याचा माझा विचार नाहीं. आपल्या देशाचें वैभव कोणच्या तऱ्हेचें आहे हें साधारणपणें लक्षांत आलें म्हणजे पुरे आहे. प्रथम चाहाचा जिन्नस घेतला असतां चाहा चीन देशांत पिकतो हें सर्वत्रांस ठाऊक आहे. चीन देशाशीं कंपनी सरकारचा व्यापार होता, त्यांत चाहाच्या संबंधानें एकंदर व्यापार कंपनी सरकाराशिवाय दुसरे कोणी करूं नये असा प्रतिबंध पुष्कळ वर्षें होता. तो प्रतिबंध १८३४–३५ सालीं अखेर

नाहींसा झाला. पुढें हिंदुस्थानांत चाहा उत्पन्न करण्याची सोय आहे असें साहेब लोकांस वाटल्यावरून हिमालय पर्वताच्या पायथ्याशीं जे प्रदेश, असाम, काचार, छोटा नागपूर, आदिकरून आहेत, तेथें चाहा उत्पन्न करण्याचा उद्योग सुरू झाला. त्यास पुरीं पंचवीस वर्षें झालीं नाहींत. चाहास या देशांत युरोपियन वस्तीशिवाय खप विशेष नाहीं, यामुळें बहुतेक चाहा बाहेर विलायतेस जातो. १८५१ पासून १८५५ साला पर्यंत दरसाल सुमारें ४॥ लाख रूपयांचा चाहा पर देशीं गेला. १८५५–६० सालांत हें सरासरीचे मान दरसाल ८॥ लाख रुपयांवर येऊन बसलें. १८६१–६५ सालांत हें मान तिप्पट वाढलें, म्हणजे २२॥ लाख रुपयांचा चाहा सरासरीनें दरसाल बाहेर गेला. १८६५–७० चे दरम्यान हें मान फार वाढलें आहे, त्याचे प्रमाण खालीं लिहिले तपाशिलावरून दिसून येईल. चाहाच्या बागा सुमारें ४५९ सदर प्रांतांत हल्लीं झाल्या आहेत. एकंदर चाहा खालीं गुंतलेली जमीन ६०–६५ हजार एकर आहे. चाहाचें पीक १८७० सालीं १। कोट पौन्ड, दर पौन्डास आठ आणेप्रमाणें पन्नास लाखापासून ६० लाख रुपयांचे किंमतीचें, झालें. व सत्तर हजार मजूर लोक या बागांत कामावर असून त्यांचा उत्तम चरितार्थ होत आहे. हा एक चाहाचा तपशिल झाला. याप्रमाणेंच काफी-चाही तपशिल आहे. काफी आरबस्थानांत पिकते हें सर्वत्रांस विदीत आहेच. ज्याप्रमाणें उत्तरेस हिमालयाचे पायथ्याशीं चीन देशांत मुख्यत्वेंकरून पिकणाऱ्या चाहास फरमाशी हवा, पाणी, व जमीन मिळाल्यामुळें तिकडे तें पीक वाढलें, त्याचप्रमाणें दक्षिणेंत निळगिरी पर्वताच्या माथ्यावर व बाजूवर, तसेच सिंव्हलद्वीपांत, काफीचें पीक होईल असें साहेब लोकांस वाटल्यावरून आपल्या देखत, म्हणजे सुमारें २५ वर्षांचे आंत, हा उद्योग तिकडे सुरू झाला. निळगिरीचे पहाडांत हल्लीं साहेब लोकांच्या काफीच्या बागा २८२ आहेत, व २१५०० आपल्या लोकांनीं त्यांचे उदाहरण पाहून केल्या आहेत. एकंदर दोन्ही मिळून एक लाख एकर जमीन या कामीं गुंतली आ-

हे. याशिवाय मद्रासेतील दुसरे प्रांतीं व त्रावणकोर संस्थानाचे अमलांतील मुलखांत काफी पिकते ती वेगळीच आहे. काफीचा जिन्नसही एतद्देशीय लोकांच्या खपाच्या जिनसांपैकीं नाहीं. यामुळें युरोपियन वस्तींत जो खप होतो त्याशिवाय बाकीचा सर्व माल विलायतेस जातो. १८५०–५५ पर्यंत दरसाल सरासरी ९॥ लाख रुपये किंमतीची काफी बाहेर देशीं गेली. १८५५–६० सालापर्यंत हें सरासरीचें मान १३॥ लाख रुपयांचें झालें. पुढील पांच सालांत हें मान ५५॥ लाख रुपये झालें; त्याच्या पुढील पांच सालांत हें मान फारच वाढलें. एकंदर १८७० सालीं २८ पौन्डाचा मण अशा मणावर चार आणे जकातीचें उत्पन्न ३॥ लाख रुपये झालें, ह्मणजे ८५॥ लाख रुपयांचा जिन्नस बाहेर देशीं गेला असें ह्मटलें असतां चालेल. ह्याप्रमाणें ह्या जिनसांची हवाल आहे.

ह्याप्रमाणें अरबस्थानाचा मुख्य जिन्नस काफी, व चीन देशाचा मुख्य जिन्नस चाहा, ह्यांचे कायमचें वास्तव्य आपल्या देशांत झालें आहे येवढेंच नाहीं, परंतु त्यांचा फैलाव दिवसें दिवस होत आहे. आतां कापसाच्या संबंधानें आपल्या देशाच्या सामर्थ्याचें वर्णन करणें जरूर आहे. अमेरिकेंतील लढाई सुरू होण्यापूर्वीं या देशांतून कापूस विलायतेस वगैरे बाहेर देशीं जात असे, परंतु त्याचें मान फार किरकोळीनें होतें. बहुशा कापूस देशाचा देशांतच खपत असे. अमेरिकेच्या कापसापुढें आपल्या देशांतील वाईट कापुसास कोणी विलायतेच्या बाजारांत पुसत नसत. १८६० सालापासून १८६८ पर्यंत अमेरिकेंतून व हिंदुस्थानांतून विलायतेस कापूस गेला त्याचें मान खालील कोष्टकावरून कळून येईल.

| | अमेरिकेंतील कापूस गट्ठे. | हिंदुस्थानांतील कापूस गट्ठे. |
|---|---|---|
| १८६०–६१ | २८३८००० | ४२२००० |
| १८६१–६२ | २०२६००० | ७४०००० |
| १८६२–६३ | ८०००० | ८०५००० |
| १८६३–६४ | १४५००० | १०४८००० |
| १८६४–६५ | २१७००० | १३४९००० |
| १८६५–६६ | ४८८००० | १०५६००० |
| १८६६–६७ | १२८२००० | १६१९००० |
| १८६७–६८ | १३६१००० | १३५००० |
| १८६८–६९ | १३५००००. | १३७०००० |

यावरून हें ध्यानांत येईल कीं, विलायतेच्या बाजारांत १८६०–६१ सालीं जितका कापूस खपला त्यांतून दर शंभर गठ्यांपैकीं ८२ गट्ठे अमेरिकेंतील होते, व आपल्या इकडील शेंकडा १२ गट्ठे होते. तेंच मान दोन वर्षांत ज्या वेळेस कापसाची चणचण झाली तेव्हां दुप्पट, तिप्पट, चौप्पट, वाढलें. हल्लीं कापसाची किंमतही उतरली आहे, व अमेरिकेंतून कापूस पुन: पूर्ववत् येऊं लागला, तरी आपलें चढलेलें मान विशेष कमी झालें नाहीं. १८६८–६९ सालीं निमा कापूस अमेरिकेंतील, व निमा आपल्या देशांतील, पिकलेला विलायतेच्या बाजारांत खपला. ह्या कापसाच्या व्यापाराच्या संबंधानें मुंबई बंदराचें महत्व विशेष आहे. एकंदर १६ लाख गट्ठे १८७०–७१ सालीं या देशांतून बाहेर देशीं गेले, त्यांपैकीं १२ लाख गट्ठे कापुस एकट्या मुंबई बंदरांतून बाहेर गेला. बाकी चार लाख सुमारें बंगाल, मद्रास, वगैरे इलाख्यांतील बंदरांतून गेला. मुंबई बंदराच्या व्यापाराच्या हकीकतीचे जे रपोट दरवर्षी छापतात त्यांतील शेवटल्या रपोटांत मागील दहा सालांत मुंबई बंदरांतून कापूस किती पौंड वजनाचा व किती किंमतीचा बाहेर देशीं गेला, व त्यांपैकीं खुद्द विलायतेस किती कापूस गेला, ह्याबद्दल तपशिलवार माहिती दिली आहे. ती पुढील कोष्टकावरून ध्यानांत येईल:—

| मुंबई बंदरांतून बाहेरदेशी एकंदर किती कापूस गेला त्याचे | | | पैकीं खुद्द विलायतेस किती कापूस गेला त्याचे | |
|---|---|---|---|---|
| | वजन पौंड | किंमत रुपये. | वजन पौंड. | किंमत रुपये. |
| १८६२–६३ | ३६॥ कोटि | १९ कोटि. | ३४॥ कोटि | १४ कोटि. |
| १८६३–६४ | ४०॥ | २८ | ३८॥– | २६॥ |
| १८६४–६५ | ३८ | ३०$\frac{1}{3}$ | ३६ | २९ |
| १८६५–६६ | ५२॥। | २५॥ | ५०॥ | २४॥ |
| १८६६–६७ | २७$\frac{2}{3}$ | १२ | २६$\frac{1}{3}$ | ११$\frac{1}{3}$ |
| १८६७–६८ | ४४॥ | १५॥ | ३९। | १३॥ |
| १८६८–६९ | ४९$\frac{1}{3}$ | १९ | ४० | १२ |
| १८६९–७० | ३८॥ | १४$\frac{1}{5}$ | ३१ | ११॥ |
| १८७०–७१ | ४३$\frac{1}{3}$ | १५॥ | ३५॥ | १३ |
| १८७१–७२ | ५३$\frac{1}{3}$ | १४॥ | ३८ | १०$\frac{1}{3}$ |

ह्या कोष्टकांत ध्यानांत ठेवण्या सारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. परंतु मुख्य ही कीं, किंमतीच्या तेजीवर आपला कापसाचा व्यापार हल्लीं अवलंबून नाहीं. मागील दोन चार सालांत किंमती साधारण असून ही एकंदरींत १८७१–७२ सालीं जितका कापुस आपल्या बंदरांतून बाहेर गेला, इतका अमेरिकेंतील लढाई चालू होती तेव्हां देखील गेला नाहीं. तेव्हां आपल्या मालाची चहा वाढली आहे ह्मणून इतका पुष्कळ कापूस बाहेर खपला गेला हें उघड आहे. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी ही आहे कीं, एकट्या विलायतेवर जसे आपण दहा वर्षां मागें कापसाच्या संबंधानें अवलंबून होतों तसे आतां अवलंबून नाहीं. विलायतेशीं पूर्वीं जो आपला व्यापार होता तो कमी झाला नाहीं, व वाढला ही नाहीं, परंतु इतर देशांशी जो मुळींच व्यापार नसे, तो मात्र दिवसेंदिवस वाढत चालला आहे. ह्मणजे १८६३–६४ सालीं ४०॥ कोट पौंड कापूस एकंदर बाहेर धाडला, त्यापैकीं दोन कोट पौंड कापूस खेरीज करून बाकी सर्व माल विला-

यतेंत खपला. त्याच मानानें एकंदर २८ कोटि रुपये किंमतीपैकीं २६ कोटि रुपये त्या देशांतून इकडे आले. ती स्थिति हल्लीं नाहीं. ह्मणजे विलायतेस जो ३८ कोट पौंड कापूस १८६३–६४ सालीं आपण धाडला, तितकाच कापूस १८७१–७२ सालीं धाडला, परंतु विलायते खेरीज इतर देशांत १८६३–६४ सालीं दोन कोट पौंड धाडला होता त्या ठिकाणीं १४ कोट पौंड कापूस १८७१–७२ सालीं धाडला. तसेच आलीकडे कापसाची किंमत कमी आहे त्या मानानें देखील चार कोट रुपये विलायते शिवाय मुलखांतून आपणास १८७१-७२ सालीं मिळाले. हा प्रकार ज्याचे समजुतीस येईल त्यास आनंद झाल्यावाचून राहणार नाहीं. कारण विलायतेशीं जेव्हां प्रथम कापसाचा व्यापार वाढूं लागला तेव्हां ही मोठी भीति सर्व लोकांच्या चित्तांत होती कीं, लढाई संपली, व पुन: अमेरिकेकडून कापूस विलायतेस येऊं लागला, ह्मणजे इकडील मालास कोणी विचारणार नाहीं. ती भीति धरण्याचें आतां पुष्कळ अंशीं कांहीं कारण उरलें नाहीं. कारण आपला कापूस वजनाच्या मानानें विलायतेस कमी जात नाहीं एवढेंच नाहीं, परंतु विलायतेखेरीज इतर देशांत पूर्वीं आपला कापूस मुळींच जात नसे तो आतां बराच जाऊं लागला आहे. एकंदरींत कापसाच्या व्यापारानें आपणास दगा दिला अशी जी कित्येक लोकांची समजूत आहे ती निष्कारण आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. १८५०–५१ पासून १८५५–५६ पर्यंत सरासरीनें दरसाल कापूस तीन सव्वातीन कोटी रुपयांचा बाहेर गेला, तेंच मान १८६० सालापर्यंत होतें, म्हणजे १८५५–६० पांच सालांची सरासरी काढतां ३॥। कोटी रुपयांचा कापूस बाहेर गेला, असे दिसून यतें. १८६० पासून १८६५ सालांत जें कापसाला तेज आलें होतें तेणेकरून सरासरीचे मान २२ कोटि रुपये झालें. व दोन सालें १८६४ व ६५ सालीं, ३६ पासून ३७ कोटि रुपये कापसाचे व्यापारांत या देशास मिळाले. त्या पुढील पांच सालांत हे मान उतरलें आहे तरी १५ कोटी रुपये दरसालचे सरासरीनें या देशांत येतात,

ह्मणजे लढाईच्या पूर्वींच्या मानापेक्षां चौपटीनें सुमारें हल्लीं कापसाची किंमत आपणास मिळते; याप्रमाणें कापसाच्या व्यापाराची स्थिति आहे. लोकरीचे व्यापाराचीही स्थिति अशीच आहे. १८५०-५५ सालापर्यंत १५ लाख रुपयांची लोकर सरासरीनें दरसाल बाहेर गेली, पुढील पांच सालांत हें मान ३५ लाखांचें झालें. त्याच्या पुढील पांच सालांत हें मान ७७ लाख झालें. त्याच्या पुढील पांच सालांत हे मान थोडें कमी झालें आहे. तथापि ६० पासून ६५ लाख किंमतीची लोकर हल्लीं बाहेर जाते. त्याचप्रमाणें जवसाचे व तिळाचे व्यापाराची वृद्धि झाली आहे. प्रथम वरील जिन्नस विलायतेस रूस देशांतून जात असत. १८५४ सालीं रूस लोकांबरोबर इंग्रेज व फ्रेंच लोकांची लढाई सुरू झाली. त्याच्या पूर्वींचे सालीं ४७ लाख रुपये किंमतीचे हे जिन्नस बाहेर देशीं हिंदुस्थानांतून गेले. १८५४-५५ सालीं हें मान एकदम दुपटीचें झालें. १८५५-५६ सालीं हेंच मान तिपटीचें झालें, म्हणजे सव्वा कोट रुपयांचा माल बाहेर गेला. पुढें इकडील जिनसाची चहा अशी वाढली कीं, लढाई बंद झाली तरी हें मान वाढत गेलें. हल्लीं कांहीं कमती झालें आहे तरी सव्वा कोटीला तूट नाहीं. तांदुळाविषयीं हाच चमत्कार झाला आहे. बंगाल्यांतून व पूर्वेकडील मुलखांतून पूर्वीं दोन सव्वा दोन कोट रुपयांचा हा माल बाहेर जात असे. अमेरिकेंतील लढाई सुरू झाली तेव्हांपासून युरोपांतील एकंदर मुलखांत आपले तांदूळ गोड लागूं लागले. त्यांचा खप इतका वाढला कीं, १८६० सालीं जे २। कोटी रुपयांचे तांदूळ बाहेर गेले, त्यांचे ठिकाणीं १८६२ सालीं ३॥ कोटी, १८६४ सालीं ४ कोटी, १८६५ सालीं ५॥ कोटी, रुपयांचे तांदूळ आपण धाडूं लागलों. लढाई संपून बरींच वर्षें झालीं तरी पेगू व सयाम व बंगाली तांदूळ युरोपांतील देशांत आवडीनें लोक घेतात.

वर तपशिलवार हकीकत मुख्य मुख्य व्यापाराच्या जिनसांबद्दल लिहिली आहे, त्याजवरून आपल्या देशाची समृद्धि व वैभव कशी असाधारण आहेत हें लक्षांत आलें असेल. चीन देशांतील जिन्नस

अरबस्थानांतील जिन्नस, अमेरिकेंतील जिन्नस, रूसदेशांतील जिन्नस ह्या देशांत हवे तसे, हवे तितके, पिकतात हें आपलें महत्‌भाग्य आहे, असें मानण्यास काय अडचण आहे? जमीन, पाणी, व हवा, यांची अनुकूलता आहे, मनुष्यबळाची मात्र आस्ति आहे. आपल्या लोकांच्या दौर्बल्यामुळें एक जिन्नस पिकविण्याकडे विशेष लक्ष आपण पुरविल्यास दुसऱ्या जिनसाची कमतरता होते, हा अनुभव कापसाचें पीक वाढलें त्या सालीं धान्य महाग झालें तेव्हां प्रत्यक्ष सर्वत्रांस आला. हें असो, या संबंधानें विशेष विस्तार आतां करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

एकंदरींत आपला परदेशाशीं व्यापार कसा वाढत गेला आहे याचें स्वरूप लक्षांत येण्याकरितां १८३४ सालापासून आजपर्यंत दर पांच सालाची सरासरी काढून खालील कोष्टक तयार केलें आहे त्यावरून मान ध्यानांत येईल.

| माल देशांत बाहेरून एकंदर आला तो रुपये | | माल देशांतून बाहेर गेला तो रुपये | व्यापाराची एकंदर बेरीज रुपये |
|---|---|---|---|
| १८३४–३९ | ७ २/३ कोटी | ११ १/३ कोटी | १८ ५/६ कोटी |
| १८३९–४४ | १० १/२ ,, | १४ १/४ ,, | २४ ३/५ ,, |
| १८४४–४९ | १२ १/५ ,, | १७ ,, | २९ १/५ ,, |
| १८४९–५४ | १५ ४/५ ,, | २० ,, | ३५ ४/५ ,, |
| १८५४–५९ | २६ ४/५ ,, | २५ १/५ ,, | ५२ ४/५ ,, |
| १८५९–६४ | ४१ ,, | ५३ १/६ ,, | ८४ ३/४ ,, |
| १८६४–६९ | ४९ १/३ ,, | ५७ २/३ ,, | १०७ ,, |
| १८७०—.... | ४६ २/३ ,, | ५३ १/५ ,, | १०० ,, |
| १८७१—.... | ३८ २/३ ,, | ५७ ४/५ ,, | ९६ २/६ ,, |

सदरील तपशिलावरून तीन गोष्टींची फोड वाचणारांच्या ध्यानांत सहज येईल. (१) बाहेरून येणाऱ्या मालाचा आंकडा माल बाहेर

जातो त्यापेक्षां पुष्कळ कोटींचे फरकानें कमी असतो ( २ ). हा फरक दरसाल वाढत चालला आहे. १८३४ सालीं चार कोटींचा फरक होता, तो १८७० सालीं साडेसात कोटी, व १८७१ सालीं १९ कोटींचा फरक पडला. ज्या मानानें बाहेर जाणाऱ्या मालाची किंमत अथवा मान वाढलें आहे, त्या मानानें देशांत येणाऱ्या मालाचें मान अथवा किंमत वाढली नाहीं. आपला व्यापार दोन्ही रीतींनीं वाढला आहे, तरीं स्वतंत्र मुलखाचा व्यापार जसा सारखा दोन्ही अंगानें वाढतो तसा वाढला नाहीं. मूळ बाहेर जाणारा माल बाहेरून येणाऱ्या मालापेक्षां कमी असावा हें ज्या देशांतील व्यापाराचें स्वरूप अविकृत असतें त्या देशाच्या व्यापारांत मुख्य लक्षण आढळतें. तें लक्षण आपल्या देशाच्या व्यापारांत दिसत नाहीं एवढेंच नाहीं, परंतु ही विकृति दिवसेंदिवस वाढत चालली आहे. याविषयींच्या कारणाचा विचार पूर्वीं झाला आहे तेव्हां पुनरुच्चार करणें जरूर नाहीं. आपल्या देशाची संपत्ति वाढत आहे किंवा नाहीं, याचें मान देशांतून जो माल बाहेर जातो त्यावर केवळ बांधतां येत नाहीं. जो देशांत बाहेरून माल येतो तो माल दिवसेंदिवस जास्ती खपविण्याचें सामर्थ्य देशाच्या अंगीं आल्यास देशांत संपत्ति वाढल्याचें अनुमान करण्यास विशेष कारण होतें. आपल्या देशांतून बाहेर माल जातो त्याचें मान वाढलें आहे, याचें एक उघड कारण देशावरील करांचे ओझें फार वाढलें आहे. जितकें कराचें ओझें फार वाढतें तितक्या अंशानें माल विकणारे लोकांस आपला माल विकण्याचें विशेष जरूर पडतें. आतां हें कराचें मान कसें वाढलें आहे याचें प्रमाण पाहिलें असतां १८३४–३९ या पांच सालांत सरासरीनें २२ कोटि रुपये दरसाल इंग्रजी अमलांतील हिंदुस्थानची वसुली बेरीज होती. ही वसुलाची रकम पुढील पांच सालांत सरासरीनें २४ कोट रुपये झाली. पुढील पांच सालांत वसुलाची बेरीज दरसाल सरासरी २५ कोट रुपयांची होती. पुढील पांच सालांची सरासरी २८ कोट रुपये पर्यंत वाढली. पुढील पांच सालें, ह्मणजे १८५४–५९, यांत हें सरासरीचें मान ३४ कोट

रुपये पर्यंत चढलें. त्याचे पुढील पांच सालांत हें मान ४५ कोट रुपयांचें झालें. पुढील पांच सालांत हें मान ४७ कोटीचें झालें. व अलीकडे पांच सालें हें मान ५० कोटींवर येऊन बसलें आहे. एकंदरींत तीस वर्षां पूर्वी जो हिंदुस्थानाचा वसूल होता त्याचे दुपटीनें हल्लीं वसुली बेरीज झाली आहे. इतका वसूल वाढला आहे, यामुळें त्याची फेड करण्याकरितां शेतकरी व इतर धंद्याचे लोकांस बाहेर देशीं माल पूर्वीपेक्षां ज्यास्ती पाठवावा लागतो. आपल्या देशांतच सदर माल खपवूं ह्मटल्यास सवड नाहीं. बाहेर देशीं आपल्या मालास किंमत बरी येते, यामुळें आपण बाहेर माल धाडतों. जितका, माल आपण बाहेर धाडतों, त्यापैकीं जेवढा भाग कराची रक्कम दुप्पट झाली आहे त्याची भरती करण्याकरितां बाहेर देशीं जातो, तितक्या मानानें आपला व्यापार खरोखरी वाढला असें ह्मणवत नाहीं. एकाद्या गृहस्थास पुष्कळ सावकार लोकांचें कर्ज असलें ह्मणजे त्याचे फेडी करितां त्याचा महिन्याचा पगार आला, किंवा सालीना त्यास तैनात पोंचते ती पोंचली, ह्मणजे त्याच्या पगाराचा किंवा तैनातीचा सर्व ऐवज रुपयांच्या रुपानें किंवा त्याचें रूपांतर होऊन बाजारांत वांटला जातो, या संबंधानें त्याचा सर्व पैसा घराबाहेर जातो ह्मणून त्याचा बाजारांत व्यापार मोठा चालला आहे असें ह्मणतां येणार नाहीं. तद्वत् आपल्या देशाची स्थिति आहे. आपल्या देशाच्या वसुलापैकीं विलायतेस जो भाग खर्चला जातो त्याच्या संबंधाचा विचार वेगळा आहे. त्याची फोड समजुती पुरती पूर्वी झाली आहे. हल्लींचा विचार स्वतंत्र आहे. जो आपला बाहेर देशांशीं व्यापार होतो त्यापैकीं सरकारच्या वसुलाची बेरीज भरून देण्याकरितां रयत लोकांस आपला माल विकण्याचें जितकें जरूर पडतें, व त्या संबंधानें जितका माल बाहेर जातो, तितक्या अंशानें देशाचा व्यापार वाढला असें ह्मणतां येत नाहीं. हा विचार सर्वत्रांचे ध्यानांत सहज येत नाहीं, परंतु यांत विशेष गूढ ह्मणण्यासारखें कांहीं नाहीं. मागील तीस वर्षांत आपला व्यापार कांहींच वाढला

नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. व्यापार वाढला आहे परंतु वर जे तपशिलवार आंकडे दिले आहेत त्याजवरून व्यापार वाढल्याचें जें मान कळून येतें तें मात्र वास्तविक मान नाहीं. त्यापैकीं जितका माल कराचे फेडीकरितां आपण बाहेर देशीं धाडला तितका व्यापार वाढला नाहीं, असें समजणें जरूर आहे. हें अनुमान खरें आहे अशा विषयीं दुसरें प्रमाण असें आहे. पृथ्वींतील सर्व स्वतंत्र देशांच्या व्यापाराची स्थिति अशी आहे कीं, एका देशाचे निरनिराळे प्रांतांचा देशातले देशांत जो परस्पर व्यवहार होत असतो त्यापेक्षां त्या देशाचा अन्य देशाशीं व्यवहार कमी असतो, किंवा निदान या दोन्हींमध्यें कांहीं सारखें प्रमाण असतें. आपल्या देशाची स्थिति तशी नाहीं. बाहेर देशाशीं आपली एकंदरींत व्यापार संबंधानें सुमारें १०० कोट रुपयांची घडामोड चालते. परंतु आपल्या देशांतील बंदरांचा एकमेकाशीं व्यापार अवघा २९ कोठी रुपयांचा होतो. यावरून विचार पाहातां, २० कोटी प्रजेची एकमेकाशीं जी देवघेव होते तिचें मान सदर प्रजेचा दूरदेशस्थ द्वीपांतील लोकांशीं जो व्यवहार घडतो त्याच्या चौथ्या हिशानें आहे. यावरून ही वरील अनुमानास बळकटी येते, ह्मणजे आलीकडे जो आपला बाहेर माल जास्ती जातो तितक्या अंशानें आपला व्यापार वाढला असें ह्मणता येत नाहीं.

आपल्या देशांतून बाहेर देशीं जो माल जातो त्याचें मान वीस वर्षांत पुष्कळ वाढलें आहे, तथापि नुसत्या आंकड्यांवरून जो बोध होतो तो खरा नव्हे, त्याप्रमाणें देशाची संपत्ति व सामर्थ्यहीं वाढलीं नाहींत; देशांतून पुष्कळ माल सरकारच्या वसूलीची बेरीज दुप्पट वाढली त्याच्या नडीनें बाहेर देशीं पाठविला जातो, तितक्या मानानें व्यापार वाढला असें होत नाहीं; ह्या सर्व गोष्टींचा खुलासा वर विस्तारानें केला आहे, व सदरील अनुमानास बळकटी आणणारें दुसरें प्रमाण दाखविण्यांत आलें कीं, देशाची खरोखर संपत्ति वाढून आपला व्यापार वाढला असता तर, आपल्या देशांतील बंदरांचा एकमेकाशीं व्यापार ही त्या मानानेंच वाढला असता. तो व्यापार तसा वाढला नाहीं तेव्हां परद्वीपस्थ

लोकांशीं जो आपला वाढलासा दिसतो तो पुष्कळ अंशानें मिथ्याभास आहे, ह्याचें ही स्पष्टीकरण वर केलें आहे. हल्लीं देशांत जो माल बाहेरून येतो त्याबद्दल थोडा विचार कर्तव्य आहे. आपल्या देशांत सोन्या रुप्याच्या खाणी नाहींत, व दागिन्यांच्या कामीं व चलनीकरितां कोट्यावधी रुपयांच्या किंमतीच्या सोन्यारूप्याचा खप आपल्या देशांत दरसाल होतो, या दोन कारणांमुळें बाहेरून येणाऱ्या माला मध्यें सोनें व रुपें हे जिन्नस कांहीं अंशी मुख्य आहेत. व हे जितके विपुलतेनें आपणांस मिळतील तितकी या देशाची स्थिति चांगली होणार आहे. एकंदर २० कोटी प्रजेच्या दागिन्यांच्या कामीं कोट्यावधी रुपयांचें सोनें व रुपें दरसाल झिजून मातींत मिळत आहे, तशीच चलनीच्या कामीं ही झिज बहुत होत आहे. एकंदरींत अनुमान असें आहे कीं, दरसाल चार कोट रुपयांचे चलनीच्या कामीं सोनें व रुपें लागतें, व त्याच मानानें दागिन्यांची झिज ही होत असेल. एकंदरींत आठ कोटी रुपयांचें सोनें व रुपें या देशांत आलें नाहीं तर या देशाची दरसाल सर्वस्वी अडचण होणारी आहे. यामुळें ह्या सोन्यारुप्याची जरूर आपणास पृथ्वींतील इतर देशांच्या लोकांपेक्षां फार नडीची आहे. फ्रेंच लोकांनीं मागील दोन सालांत जर्मन लोकांस लढाईचे खर्चाकरितां सुमारें दोनशें कोट रुपये भरले, त्यांपैकीं सुमारें एक तृतीयांश रकमेची फेड नवीन कर न बसवितां चलन बदलून केली. ह्मणजे पूर्वीं चलन सोन्यारुप्याची होती, ती कमी केली, व त्या ऐवजीं नोटींचें कागद चालवून सर्व चलनीचें सोनें व रुपें जर्मन लोकांच्या पदरांत घातलें. यामुळें एक तृतीयांश रक्कम नवीन कर न बसवितां त्यांस एकदम देतां आली. तसें आपल्या लोकांचे अंगीं शहाणपण, समज, व विश्वास नाहीं, यामुळें चलनीच्या कामीं कोट्यावधी रुपयांचें सोनें व रुपें गुंतून राहिलें आहे, तसेंच दागिन्यांच्या वेडामुळें ही सोन्यारुप्याचा मोठा खप आपणांत होतो. सदरील कारणांकरितां बाहेरून येणाऱ्या मालामध्यें सोन्या रुप्याची योग्यता विशेष गणली आहे.

बाहेरून येणाऱ्या मालाचें प्रमाण साळोसाल कसें वाढलें आहे याचें दिग्दर्शन पूर्वी एके ठिकाणीं केलें आहे, परंतु त्यांत सोन्यारुप्याची व इतर जिनसांची फोड केली नाहीं. ती फोड समजणें अवश्य आहे, याजकरितां खालील कोष्टक तयार केलें आहे.

| बाहेरून सोनें व रुपें आलें तें एकंदर. | कोटि रु० | सोनें रुपें धरून एकंदर माल आला तो. कोटि रु० | बाहेर माल गेला तो. कोटि रु० |
|---|---|---|---|
| १८३४-३५ | २ | ६। | ८ |
| १८३५-३९ | २ १/३ | ७ १/३ | ११ १/४ |
| १८३९-४४ | २ ३/४ | १० २/५ | १४ |
| १८४४-४९ | ३ | १२ १/४ | १७ |
| १८४९-५४ | ४ | १६ ३/० | २० |
| १८५४-५९ | ११ १/४ | २६ ३/४ | २६ |
| १८५९-६४ | १७ | ४१ | ४३ |
| १८६४-६५ | २१ | ४९ १/४ | ६९ १/२ |
| १८६५-६६ | २६ | ५६ | ५७ १/२ |
| १८६६-६७ | १४ | ४५ | ५० |
| १८६७-६८ | ११ | ४९ | ५१ १/२ |
| १८६८-६९ | १५ | ५१ | ५४ |
| १८६९-७० | १४ | ४७ | ५३ |
| १८७०-७१ | १५॥ | ४९ | ५८ |

सदरील तपशिलावरून असें कळून येईल कीं, बाहेरून येणारा माल व सोनेंरुपें ह्यांचें मान आलीकडील दहा वर्षांत पहिल्या वीस वर्षांपेक्षां फार वाढलें आहे, तथापि सोनें रुपें व इतर जिन्नस धरूनही देशांत येणारा माल दर-

माल देशांतून बाहेर जाणाऱ्या मालाच्या रकमेहून फार कमी आहे. ही तूट पूर्वी जो राज्यव्यवस्थेच्या संबंधानें खंडणीचा प्रकार सांगितला त्या रूपानें आपणास सोसावी लागतें. ही खंडणी देण्याचे जरूर न पडतें तर हल्लीं जें सोनें रुपें आपल्या देशांत येतें त्यापेक्षां पुष्कळ कोटी ज्यास्त आलें असतें. हा विचार पूर्वीं विस्तारानें झाला आहे, याजकरितां त्याचा पुनः विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. बाहेरून येणारा माल आलीकडे दहा वर्षांत वाढला आहे ही जरी गोष्ट खरी आहे, तथापि या सर्व विषयाचें स्वरूपच असें आहे कीं, यांतील प्रथम दर्शन सत्य नसतें. बाहेरून येणारा माल पुष्कळ पटीनें वाढला आहे असें दिसतें खरें, परंतु त्याची बारीक फोड करून पाहिली असतां प्रथम झालेला भास दूर होतो. साधारणतः सरळ व बरोबरीच्या व्यापारांत जितका बाहेरील देशांचा जिन्नस आपल्या देशांतील चालू उद्योगांत कमतरता न होतां देशांत खपेल, तितकें देशाचें सामर्थ्य वाढलें असें मानण्यास हरकत नाहीं. देशांतील उद्योगास बाळवी लागून बाहेर देशाचा माल ज्यास्ती बाहेर जाऊं लागल्यानें केवळ एकंदर देशाचें सामर्थ्य वाढलें असें ह्मणता येणार नाहीं. हा बारीक विचार सर्वत्रांचें ध्यानांत यावा म्हणून दृष्टांत घेऊं. एक मोठें कुटुंब आहे असें समजा. त्यांतील पुरुष निरनिराळे धंदे करून एकमेकांची गरज पुरवितात, कोणी शेतकी करतो; कोणी वस्त्रें विणतो, कोणी व्यापार करतो, कोणी शिवतो, कोणी फाडतो, कोणी कांहीं, कोणी कांहीं, धंदा करून एकमेकांस साह्य करतात, असें मानलें तर अशा कुटुंबाचें काम कुटुंबाबाहेर दुसऱ्या लोकांस फार थोडें मिळेल. व त्या संबंधानें त्याचा बाहेर व्यापारही थोडाच चालेल. त्याच कुटुंबांत आळस शिरल्यानें ह्मणा, किंवा भांडणें लागल्यानें ह्मणा, कोणी कोणास मदत करीनासा झाला, सर्व मागील मिळवलेली संपत्ति मोडून तोडून खाऊं लागले, व कुटुंबाबाहेरील लोकांकडून आपआपलीं सर्व कामें करून घेऊं लागले, असें झालें तर त्या कुटुंबांत बाहेर तयार झालेल्या मालाचा खप पुष्कळपट वाढला असें दिसेल, येवढ्यानें त्या कुटुंबाच्या पहिल्या स्थितीपेक्षां

ह्या दुसऱ्या स्थितींत तें कुटुंब अधिक सधन किंवा समर्थ झालें असें कोणी म्हणणार नाहीं.

त्या आळशी व चैनी कुटुंबाप्रमाणें आपल्या देशाची हल्लीं स्थिति आहे. केवळ आंकड्यांच्या तपशिलांवर जाऊन उपयोग नाहीं. बाहेर देशांतून जो जास्ती माल येतो तो माल कोणच्या तऱ्हेचा आहे, त्या मालाच्या तोडीचा दुसरा माल पूर्वी आपल्या देशांत उत्पन्न होत होता किंवा नाहीं, नवीन बाहेरून माल आल्यानें देशांतील एकंदर उद्योगास कमतरता आली, किंवा उद्योग वृद्धि पावला आहे, हे सर्व विचार अवश्य झाले पाहिजेत.

शिवाय वर जे सालवार अंकडे लिहिले त्यांवरून जितका बाहेरचा माल या देशांत ज्यास्ती खपतो असें आपणास वाटतें, तितका खरो-खरी आपल्या देशांत आपल्या लोकांत खपत नाहीं. सदर मालापैकीं पुष्कळ माल आपल्या देशांत येतो, परंतु आपल्या देशांतील लोकांत त्याचा खप होत नाहीं. आपल्या देशांत साहेब लोकांची वस्ति आहे, त्यांचे सोयीकरितां व त्यांचे कारखान्याकरितां पुष्कळ माल येतो व खपतो. तेव्हां तितक्या मानानें बाहेर देशाच्या मालाचा खप आपल्या लोकांत वाढला असें ह्मणतां येत नाहीं.

या दोन्ही संबंधानें विचार पहातां विलायतेखेरीज दुसऱ्या देशांशीं आपला व्यापार चालतो त्यापासून आपला खरोखर नफा आहे. ह्म-णजे सरळ व्यापारांत बरोबरीच्या नात्यानें सदर देशांतील माल आपल्या देशांतील मालाच्या मोबदल्यानें येतो. बहुतकरून त्या मालाच्या संबंधानें देशांत पूर्वी उत्पन्न अगर तयार होणाऱ्या मालास विशेष प्रकारचा प्रत्यवाय येत नाहीं, अशा तऱ्हेचा हा व्यापार आहे. विलायतेशीं जो व्यापार घडतो त्याचें स्वरूप या दोन्ही संबंधानें वेगळें आहे. मूळ व्यापार बरोबरीच्या नात्यानें होत नाहीं. शिवाय आपल्या देशांत उत्पन्न अथवा तयार होत नाहीं अशा मालाच्या मो-बदला तिकडील माल येत नाहीं, बहुतकरून या देशांत पूर्वी उत्पन्न व तयार होत असणाऱ्या मालाच्या ठिकाणीं सदर माल येतो, व जो

माल असा येतो त्याचा बोजा आपणावर पडून किफायत त्या लोकांसच होते. या तऱ्हेचा हा व्यापार आहे, याकरितां बाहेरून येणाऱ्या मालापैकीं विलायतेहून येणाऱ्या मालाचा व इतर देशांतून येणाऱ्या मालाचा विचार स्वतंत्र केला पाहिजे.

विलायतेहून येणाऱ्या व विलायतेखेरीज अन्य देशांतून येणाऱ्या मालाची फोड केली असतां मागील १४ वर्षांत खालीं लिहिल्याप्रमाणें आपल्या व्यापाराचा क्रम वाढत चालला आहे असें कळेल.

| | विलायतेहून माल आला त्याची किंमत | इतर देशांतून आला त्याची किंमत |
|---|---|---|
| १८५८–५९ | २२ कोटी रुपये. | ९ कोटी रुपये. |
| १८५९–६० | २१॥ ,, | १३ ,, |
| १८६०–६१ | २२ ,, | ८॥ ,, |
| १८६१–६२ | २५ १/३ ,, | ८॥ ,, |
| १८६२–६३ | २५ २/३ ,, | १२। ,, |
| १८६३–६४ | २८ ,, | १५ ,, |
| १८६४–६५ | ३३ १/३ ,, | १६ २/३ ,, |
| सरासरी | ७(१८८ कोटी रु. | ७(८३ कोटी रुपये |
| | २७ कोटी | १२ कोटी |
| १८६५–६६ | ३०। ,, | १९। ,, |
| १८६६–६७ | ३३॥ ,, | २३ ,, |
| १८६७–६८ | २५॥ ,, | १६॥ ,, |
| १८६८–६९ | ३३ १/३ ,, | १४ १/३ ,, |
| १८६९–७० | ३६ १/२ ,, | १५ ,, |
| १८७०–७१ | ३१ २/३ ,, | १५॥ ,, |
| १८७१–७२ | २९ ३/४ ,, | ९ ,, |
| सरासरी | ७(२२० कोटी रु. | ७(११३ कोटी रुपये |
| | ३१॥ कोटी. | १६ कोटी. |

एकंदरींत मागील चौदा वर्षांत विलायतेशीं व विलायते खेरीज इतर देशाशीं आपला व्यापार वाढला आहे. त्याचें मान पाहतां पहिल्या सात वर्षांच्या सरासरीनें दरसाल विलायतेहून माल आला त्याचें २७ कोटीचें मान होतें, तें पुढील सात वर्षांत सरासरीचें मान एकतीस कोट झालें. अन्य देशांहून येणारा माल पहिल्या सात वर्षांच्या सरासरीनें दरसाल १२ कोट रुपयांचा आला, त्याचेच मान दुसऱ्या सात वर्षांत १६ कोट रुपयांचे सरासरीनें झालें. एकंदरींत आपला व्यापार विलायतेशीं वाढला आहे त्याहून ज्यास्त प्रमाणानें अन्य देशांशीं वाढला आहे असें कळून येईल, हें एकंदरीच्या आंकड्यावरून कळतें. याचा पोटतपशील पाहिला असतां हा प्रकार विशेष रीतीनें स्पष्ट होतो.

आपल्या देशांत व्यापाराच्या संबंधानें जो बाहेरून माल येतो त्यापैकीं जो विलायतेहून माल येतो त्यामध्यें व अन्य देशांतून येतो त्यामध्यें तीन प्रकारचा भेद आहे, असें वरील तपशिला वरून ध्यानांत येईल.

प्रथम, विलायतेहून जो माल येतो त्याबद्दलची देवघेव बरोबरीच्या नात्यानें सरळ व्यापाराची होत नाहीं. दुसरें, विलायतेहून जो माल येतो तो बहुशा या देशांत उत्पन्न व तयार होत नाहीं अशा प्रकारचा नसून पूर्वकाळीं व अंशतः हल्लींही ज्या कच्या व तयार केलेल्या मालाबद्दल या देशांतील कारागीर लोकांची सर्व पृथ्वीवर कीर्ति होती, त्या लोकांच्या उद्योगास कमतरता आणून त्या ठिकाणीं सदर विलायती मालाचा खप होत आहे.—व तिसरें अशा तऱ्हेचा जो माल नाहीं तो आपल्या देशांत येतो येवढेंच मात्र खरें, परंतु आपल्या लोकांच्या सोयीचे व गरजेचे कामीं त्याचा विशेष उपयोग होत नाहीं, तद्देशीय वस्तींतच त्याचा विशेष खप होतो. पहिल्या प्रकाराची फोड आंकड्यानें दाखवितां येत नाहीं. कारण विलायतेशिवाय इतर देशांतून जो माल येतो तो व्यापार बहुशा विलायतेंतील व्यापारी लोकांच्याच हातीं आहे. चीन देशास आपण नऊ कोट रुपयांची अफू धाडतों व

६

तिकडून तीन पासून चार कोट रुपयांचा चाहा व रेशमी कापड आणतों, हे दोन्ही व्यापार मुख्यत्वेंकरून इंग्रज लोकांच्याच स्वाधीन असल्यामुळें या व्यापारांत जी आपल्या नफ्याची बाकी आपल्या पदरांत पडावी ती प्रत्यक्ष चीन देशांतून आपल्या देशास मिळत नाहीं. विलायतेचा चीन देशाशीं व्यापार होतो त्यांत चीन देशाची बाकी विलायतेकडे निघते त्यांत वजावाट होऊन विलायतेहूनच तो पैसा आपल्या पदरांत पडतो, यामुळें पहिल्या गोष्टीचा खुलासा आंकड्यानें दाखवितां येईल असा नाहीं. तथापि एकंदरींत त्याच्या सत्यतेविषयीं शंका वाटण्यास कारण नाहीं. या संबंधानें खालीं तपशिलवार विलायतेहून माल आल्याबद्दलचे जे आंकडे दिले आहेत त्यांचे पोटांत सरकारी माल व रेल्वेचा माल तसेंच सोनेंरुपें या सर्वांचा समावेश होतो असें समजावें. पुढील पृष्ठावर कोष्टक दिलें आहे त्यावरून मागील चौदा वर्षांत विलायतेहून माल आला व विलायतेस गेला, तसाच अन्य देशाहून माल आला व अन्य देशीं आपण धाडला, याचें मान ध्यानांत आणलें असतां हा प्रकार उघड लक्षांत येईल.

| विलायतेहून माल आला त्याची किंमत. | | विलायतेस गेला त्याची किंमत. | अन्य देशांहून आला. | अन्य देशास गेला. |
|---|---|---|---|---|
| १८५८–५९ | २२ को. रु. | १० २/३ को. रु. | ९ को. रु. | १७ २/३ को. रु. |
| १८५९–६० | २१॥ | ११ | १३ | १९॥ |
| १८६०–६१ | ३२ | ११।।। | ८॥ | १७ २/३ |
| १८६१–६२ | २५ १/३ | १४ १/३ | ८।॥ | १९ २/३ |
| १८६२–६३ | २५ १/२ | १८ २/३ | १२। | १८ १/२ |
| १८६३–६४ | २८ | २७ २/३ | १५ | २१ १/२ |
| १८६४–६५ | ३३ १/४ | ४२ | १६ २/३ | २२ |
| १८६५–६६ | ३०। | ४८ १/१० | १९। | २२॥ |
| १८६६–६७ | ३०॥ | ४३ २/३ | २३ | २४ १/३ |
| १८६७–६८ | २५॥ | २२ २/३ | १६॥ | २० ३/४ |
| १८६८–६९ | ३३ १/४ | २७ १/४ | १४ १/३ | २५ १/४ |
| १८६९–७० | ३६ १/२ | २९ ४/५ | १५ | २४ २/३ |
| १८७०–७१ | ३१ २/३ | २७ ४/५ | १५॥ | २५ ३/४ |
| १८७१–७२ | २९ ३/४ | ३१ ३/७ | ९ | २६ |
| एंकदर | ४०६ | ३८० | १९६ | ३०६ |

या कोष्टकावरून विचार पहातां विलायतेहून माल व सोनेंरुपें मिळून दरसाल या देशांत जिन्नस आला त्याचा आकार आपण त्या देशास माल धाडला त्यापेक्षां ज्यास्त होत असल्यासारखें दिसतें, व अन्यदेशीं आपण माल ज्यास्त धाडला, व अन्य देशांहून आपल्या देशांत माल कमी आला, व हें अंतर सालोसाल वाढत चाललें आहे, असें दिसतें.

एकंदरींत मागील १४ वर्षांत विलायतेहून माल व सोनेंरुपें आलें त्याची बेरीज ४०६ कोट रुपये होते, व अन्य देशाहून माल आला त्याची बेरीज १९६ कोट होते. त्याच १४ वर्षांत विलायतेस

आपण माल धाडला त्याची बेरीज ३८० कोट रुपये होते, व इतर देशांत जो माल धाडला त्याची बेरीज ३०६ कोट रुपये होते. एकंदरींत ८४ कोटि रुपयांची तफावत चौदा वर्षांच्या व्यापारांत पडली. ८४ कोटि रुपयांच्या मोबदला आपणास व्यवहार दृष्ट्या कांहीं मिळालें नाहीं. आपण विलायतेस माल धाडला त्यापेक्षां जे सुमारें २६ कोट रुपये ज्यास्त विलायतेहून आल्यासारखे वाटतात ते ३६ कोट रुपये विलायतेच्या व्यापाराची खरी बाकी नव्हे, नुसत्या विलायतेच्या व्यापारांत आपणास दरसाल तूट पडते हें वर सांगितलेंच आहे. अन्य देशाहून माल आला त्यापेक्षां जो आपण ११० कोट रुपयांचा माल ज्यास्त अन्य देशीं धाडला त्याबद्दल आपल्यास ११० कोट रुपये खरोखर मिळावे, परंतु तो व्यापार साहेब लोकांचे स्वाधीन असल्यामुळें आपण जे विलायतेचें मोठे कर्ज दरसाल देणें लागतों त्यांत वजावाट होऊन बाकी आपल्या हातीं ११० कोटिच्या ऐवजी ८४ कोटि रुपये आजी बुडत खाती जाऊन बाकी २६ कोटि रुपये मात्र आले असें दिसतें. सरळ व्यापाराचा संबंध असता तर हा असा प्रकार घडून आला नसता. यामुळें अन्य देशाकडून आपणास योग्य मोबदला मिळत नाहीं असें बिलकूल समजूं नये. त्याजकडून योग्य मोबदला मिळा-वयाचा त्याची वजावाट होते, व विलायतेशीं आपला संबंध विशिष्ट रीतीचा असल्यामुळें हा असा प्रकार घडतो. आपला व्यापार विलायतेशींच असता, व इतर देशाशीं आपला व्यापार बिलकूल, चालत नसता, तर आपल्या देशांत व्यापाराच्या संबंधानें एक रुपया-ही फाजील बाकीचा आला नसता. अन्य देशाशीं आपला व्यापार चालतो यामुळेंच विलायतेची बूड जाऊन बाकी दरसाल कांहीं थोडें बहुत सोनेंरुपें आपल्या पदरांत पडतें.

आतां दुसऱ्या गोष्टींचा खुलासा पाहूं जातां विलायतेहून आपल्या देशांत माल येतो, त्यातील आपल्या लोकांत ज्या मालाचा खप विशेष होतो अशा तऱ्हेच्या मालापैकीं सर्व जातींचें कापसाचें तसेंच रेशमी व लोकरी कापड, व लोखंड, पितळ, तांबें, वगैरे धातु, व भांडीं, व

मीठ हे तीन जिन्नस मुख्य आहेत. कापड सर्व तऱ्हेचें ९ कोट रुपयांचें सन १८५०-५१ सालीं आलें. तें १८६०-६१ सालीं दहा कोट रुपयांचें म्हणजे दुप्पट झालें. हल्लीं १८७०-७१ सालीं तेंच मान २० कोट रुपयांचें झालें आहे. आपल्या देशांतून कापूस, लोंकर वगैरे गेली त्याचें मान मध्यें वाढलें होतें तें आलीकडे बरेंच कमी झालें, परंतु त्या संबंधानें विलायती कापडामध्यें अंतर पडलें नाहीं. त्याचा एकसारखा वृद्धीचा क्रम चालू आहे. वीस वर्षांत चौपटीनें मान वाढलें आहे. त्याचप्रमाणें तांबे, पितळ, लोखंड, वगैरे धातुचा माल १८५०-५५ सालांत सरासरीनें ८० लाख रुपयांचा आला. तें मान पुढील पांच वर्षांत ह्मणजे १८५५-६० सालांत १ कोट ६० लाखाचें, ह्मणजे दुपटीचें झालें. पुढील पांच वर्षांत सरासरीनें पाहतां हें मान २ कोट ३० लाखाचें झालें. त्या पुढील सात वर्षांत म्हणजे १८६५-७१ सालांत हें मान ३ कोट वीस लाख सरासरीच्या मानानें झालें आहे. ह्मणजे वीस वर्षांत ह्या जिनसांचा खप चौपट वाढला. इकडे होणाऱ्या जिनसांपैकीं विलायतेहून इकडे येतो असा तिसरा जिन्नस मीठ, त्याचें मान १८५०-५१ सालीं ७ लाख रुपयांचें होतें, तें १८७०-७१ सालीं ३७ लाखांचें झालें आहे. हें मीठ विलायतेहून येथें येते याबद्दल सर्वत्रांस चमत्कार वाटल्यावांचून रहाणार नाहीं. या देशांत मिठाची स्वाभाविक उत्पत्ति समुद्राचे पाणी अडवून धरलें ह्मणजे आयासाविना होत असतां, तीन हजार कोसांवरून हा जिन्नस येथें येतो कसा, व येथें येऊन ह्या देशांतील मिठाहून स्वस्थ खपतो कसा, ह्याबद्दलची समजूत पुष्कळांची होत नाहीं. परंतु याविषयींची खरी माहिती अशी आहे कीं, विलायतेहून मीठ येतें तें विकण्याचा जिन्नस म्हणून जहाजांत भरून आणीत नाहींत. इकडील बंदरांतून माल भरून नेण्याकरितां जीं रिकामीं जहाजें व आगबोटी विलायतेहून इकडे येतात, त्यांत गलबतास बुडीं वजन पाहिजे ह्मणून दगड, माती, वाळू, वगैरे भरण्याची रीत आहे, ती दगड, वाळू, माती, येथें आल्यावर काढून

समुद्रांत ओतून टाकून नंतर जहाज भरतात. त्या वाळू, माती, व दगडांचे ठिकाणीं तिकडील व्यापाऱ्यांनीं मीठ भरून धाडण्याची तजवीज केली आहे. असें आपल्या इकडे मीठ अल्पायासें तयार होतें तसेंच तिकडेही होतें. माती व वाळू जहाजांत भरल्यास त्यास या बंदरांत किंमत येत नाहीं, ह्या ठिकाणीं 'निरीमा' साठीं मीठ भरलें असतां त्याचा इकडे खप होतो, व गलबत रिकामें आल्यासारखें होत नाहीं. ह्या तजविजीनें विलायती मीठ बंगालप्रांतीं खपतें. हे तीन जिन्नस एकंदरींत केले असतां १८५०-५१ सालीं सोनें व रुपें खेरीज करून एकंदर माल विलायतेहून ८। कोट रुपयांचा आला, त्यांपैकीं सुमारें सात कोटींचीं भरती होते. १८५८-५९ सालीं सोनें व रुपें खेरीज करून माल १७ कोटींचा आला, पैकीं वरील तीन जिनसांची बेरीज मिळून १२॥ कोटींची भरती होते. १८६७-६८ सालीं एकंदर माल सोनेंरुपें खेरीज करून ३०॥ कोटींचा आला, पैकीं वरील तीन जिनसा मिळून १८॥ कोटींची बेरीज होते. १८७१-७२ साली एकंदर माल ३३॥ कोटी रुपयांचा आला, पैकीं वरील तीन जिन्नस मिळून २४ कोटी रुपयांची बेरीज होते. सदरीं वर लिहिल्याप्रमाणें या जिनसाची हकीकत आहे. विलायती कापडाचा खप दिवसेंदिवस इकडे ज्यास्ती होत चालल्यानें आपले सर्व माग व कोष्टी लोकांचे धंदे कसे बसले हा सर्वत्र अनुभव आहेच. त्याचप्रमाणें धातूच्या संबंधानें ही इकडील व्यापारांस मंदी आली आहे, व मिठाच्या संबंधानें पूर्वेकडील मुलुखांत विलायतेहून सदर मीठ येऊं लागण्या पूर्वीं मीठ तयार करण्याकरितां सरकारचा मोठा कारखाना होता, त्यांत हजारों लोकांचा चरितार्थ चालत होता, तो सरकारी कारखाना सदर विलायती मीठ येऊं लागल्यापासून सरकारांनीं बंद केला. याप्रमाणें या तीन जिनसांची हकीकत आहे.

तिसरा प्रकार वर सांगितला आहे त्याचा ही खुलासा तपशिलवार दाखवितां येतो. विलायतेहून येणाऱ्या मालापैकीं वरील तीन जिनसांचा व बाकी किरकोळ जिनसा, बुकें, कागद, काचेचें सामान,

छत्र्या, लांकडी सामान, वगैरे खेरीज करून पुष्कळ जिनसा आपल्या देशांत येतात येवढेंच खरें, परंतु त्यांचा खप आपल्या लोकांत होत नाहीं. व तत्संबंधानें आपल्या देशाचा व्यापार वाढला असेंही होत नाहीं. ह्या जिनसा येणेंप्रमाणें, दारू सामान. बंदुकी, हत्यारें वगैरे, विलायती कांऊता, विलायती स्टोर लश्करी व रेल्वे खात्याकडे वगैरे खर्चा वयास आणितात तो, ह्या सर्व जिनसांचा खप बहुशा आपल्या लोकांत होत नाहीं. साहेब लोकांची वस्ती व त्यांचे कारखानें इकडे वाढल्या मुळें हे जिन्नस पूर्वी पेक्षां आपल्या मुलुखांत ज्यास्त येतात. एक कोट रुपये किंमतीची दारू, एक कोट रुपये किंमतीचे कोळसे, दीढ कोट रुपयांचें रेल्वेचें सामान, व बाकी किरकोळ जिन्नस सुमारें अर्धा कोट मिळून सुमारें चार पासून पांच कोट रुपयांचा माल हर तऱ्हेचा ह्या देशांत आलीकडे दर साल येतो. या जिनसांचा खप आपल्या लोकांत विशेषत: होत नाहीं, ह्यामुळें त्या मानानें आपला व्यापार वाढला असें ह्मणणें बरोबर नाहीं.

एकंदरींत विचारपाहतां विलायतेशीं व्यापार आपला थोडा बहुत वाढत आहे तें मान कायम राहून अन्य देशाशीं व्यापार दिवसेंदिवस ज्यास्त प्रमाणानें वाढत चालला आहे हें चिन्ह चांगल्यापैकीं आहे. हा बाहेरील देशांशीं जितका आपला व्यापार वाढेल तितक्या अंशानें विलायतेची खंडणी जाऊन, तसेंच आपल्या देशांत दरसाल दागेन्याच्या व चलनीच्या कामीं सोनें रुपें जेवढें झिजतें ती तूट पुरून, कांहीं शिलक नफा ठेवण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं येईल. आपण दोन गोष्टींनीं लंगडे आहोंत. राज्य सत्तेच्या संबंधानें अदमासें दहा कोट रुपयांची रक्कम आपणास खंडणी दाखल भरावी लागते. त्या ऐवजीं थोरांच्या आश्रयाखालीं आपण रहातों, तथापि केवळ व्यवहाररीत्या आपणाला नफा होत नाहीं. ही दहा कोटींची रक्कम भरून, शिवाय दरसाल चलन व दागिन्याचे कामीं सोन्यारुप्याची झीज व खप होतो ती रक्कम भरून आली पाहिजे. ह्या दोन अडचणी संभाळून जो नफा शिलक

राहिल त्यांतून आपला संचय होऊन त्या संचयाचे साह्यानें देशांत उद्योग वगैरे वाढणार आहे. विलायतेस जी खंडणी द्यावी लागते त्यापैकीं अंशतः आपल्याला जो मोबदला मिळतो त्याबद्दल विवेचन पूर्वींच केलें आहे. चलन व दागिन्याचे कामीं जें सोनेंरूपें आपण गुंतवून टाकतो त्याचें मान जेवढें कमी होऊन उद्योगाचे कामीं त्या-संचयाची योजना होईल तितकें आपणास हितावह होणार आहे. दे-शांत येणाऱ्या व देशांतून जाणाऱ्या जिनसांच्या व्यापारांचा क्रम मागील वीस वर्षांत कसा वाढला आहे, व त्याबद्दल जें प्रथम दर्शन होतें तें किती अंशीं सत्य आहे, तसेंच ह्या दोन्ही व्यापरांचें वास्तवीक स्वरूप कशा प्रकारचें आहे, इत्यादि गोष्टींचा खुलासा थोडा बहुत वर झाला आहे.

आतां ज्या प्रसंगाच्या स्वाधीन हल्लीं आपला देश झाला आहे त्या संबं-धानें देशावर बरे वाईट परिणाम होतात, त्यांपैकीं बरे परिणाम व्हावेत, व वाईट परिणाम टळावेत, ह्याबद्दल ह्या देशाच्या लोकांच्या हातीं तजविजी कोणच्या आहेत, व कोणच्या नाहींत, अशाविषयीं विचार करून हा विषय पुरा करूं.

साधारणतः सर्व हिंदुस्थान देशाच्या व्यापाराची स्थिति व त्याचा वृद्धीचा क्रम कसा झाला आहे, याबद्दल पूर्वीं सर्व तपशिलवार विवेचन केलें आहे, त्यावरून या देशाचें पुढील भवितव्य काय आहे, व तें इष्ट किंवा अनिष्ट आहे व इष्ट सिद्ध होऊन अनिष्ट टळेल अशा रीतीच्या तजविजी दुःसाध्य किती आहेत, व प्रयत्नानें साध्य किती आहेत, याबद्दल आतां विचार करणें आहे. एकंदरींत मागील वीस वर्षांच्या हकीकतीवरून खालील गोष्टींविषयीं सिद्धांत कायम ठरतात. ह्मणजे प्रथमतः या देशांतून बाहेर जाणाऱ्या मालाचा व देशांत बाहेरून येणाऱ्या मालाचा व्यापार मागील वीसवर्षांत आक-ड्याच्या मानावरून सुमारें तिप्पट वाढला आहे असें दिसतें. दुसरें, बाहेर जाणाऱ्या मालापैकीं शेतीच्या उद्योगानें उत्पन्न झालेले सर्व प्रकारचे जिन्नस, चहा, तांदूळ, अफू, काफी, कापूस, लोकर, नीळ,

इत्यादिकांच्या स्थितींत बाहेर देशीं जाण्याचें मान फार वाढलें आहे. तिसरें, देशांत उत्पन्न झालेले जिन्नस येथेंच कमावून तयार होऊन पूर्वी बाहेर देशीं जात होते, म्हणजे रेशीम व कापसाचें सर्व तऱ्हेचें कापड, कलाबतू, शाली, साखर वगैरे, या जिनसाच्या व्यापाराचा आलीकडे बहुतेक ऱ्हास झाला आहे. चवथें, जितक्या मानानें केवळ अंकड्याच्या तपशिलांवरून आपणास व्यापार वाढला असें दिसतें, तितक्या मानानें खरोखर व्यापार वाढला नाहीं. हिंदुस्थानासंबंधी विलायतेस जो खर्च होतो त्याचे फेडीस्तव, तसेंच येथील संचय अन्य रीतीनें विलायतेस जातो त्याचे फेडीस्तव, व एकंदरींत सरासरी वसुलाची बेरीज मागील वीस वर्षांत सुमारें दुप्पट झाली आहे त्या वसुलाचे फेडीस्तव, पुष्कळ माल विलायतेस व अन्य देशीं धाडला जातो. त्या मालाचा व्यवहाररीतीनें योग्य मोबदला आपणास मिळत नाहीं. तितक्या मानानें आपला व्यापार वाढला असें ह्मणतां येत नाहीं. पांचवें, परस्थ ब्रिटिश लोकांचा अंमल या देशावर असल्यामुळें आपला व विलायतेचा बरोबरीच्या नात्यानें सरळ व्यापार होत नाहीं. एकंदरींत पृथ्वींतील सधन देशांतील व्यापाराचें मुख्य लक्षण हें आहे कीं, बाहेरून येणारा माल बाहेर जाणाऱ्या मालापेक्षां ज्यास्ती किंमतीचा असतो. त्या उलट या देशाच्या व्यवहाराचें साधारण स्वरूप आहे. प्रत्यक्ष विलायतेस आपण माल धाडतों त्यापेक्षां त्या देशांतून माल व सोनेंरुपें धरून ज्यास्ती माल देशांत येतें असें दिसतें, परंतु राज्यसंबंधी जी आपणास खंडणी विलायतेस धाडणें जरूर पडतें, त्या खंडणीची रक्कम भरण्याकरितां विलायतेशिवाय इतर देशांशीं जो आपला व्यापार होतो तो व्यापार विलायतेंतील व्यापाऱ्यांच्या हातीं असल्यामुळें अन्य देशांकडून आपल्यास प्राप्त होणारा सर्व नफा विलायतेंतील लोकांच्या पदरांत आपणास घालावा लागतो. सदर खंडणीच्या रकमेच्या मानानें आपला दरसालाचा संचय कमी होतो. याशिवाय सहावें, या देशांत सोन्या रुप्याच्या

७

खाणीं नाहींत, व लोकांत सोन्यारुप्याचे दागिनें करण्याची चाल विशेष आहे. व चलनही सर्व रुप्याच्या नाण्याची आहे. या दोन्ही संबंधानें विलायत आदिकरून अन्य देशाहून जो आपण माल आणतों त्यांत दरसाल आठपासून दहा कोटि रुपयांचे सोनेंरुपें आणल्याशिवाय आपल्या लोकांचा निर्वाह होत नाहीं. असें दरसाल दागिन्याचे कामीं व चलनीचे कामीं जें सोनेंरुपें गुंतलें जातें, तें एकदां रूपांतर पावल्यावर व्यवहारांत विशेष उपयोगी न पडतां बहुतेक कांहीं काळानें झिजून जातें; त्यांच मानानें देशांतील संचयाचा निष्कारणीं व्यय झाल्याप्रमाणें होऊन उद्योगास कमतरता येते. सातवें, बाहेरून येणाऱ्या मालामध्यें बहुशा सर्व मोठमोठे जिनस याच देशांत पूर्वी विशेषेंकरून तयार होत होते, व हल्लींही अंशत: तयार होत आहेत, त्या उद्योगास कमतरता आणून सदरचे जिन्नस बाहेरून म्हणजे मुख्यत्वेंकरून विलायतेहून येतात, यामुळें देशांत निवळ शेतकीशिवाय इतर सर्व धंदा मंद पडला आहे. आठवें, बाहेरून जो माल येतो त्याच्या संबंधानें देशाच्या सामर्थ्याचें मान केवळ अंकड्यावरून जितकें वाढलें आहे असें वाटतें, तितकें खरोखरी वाढलें नाहीं, कारण त्यांपैकीं पुष्कळ जिन्नस या देशांत नांवाला मात्र येतात, परंतु त्यांचा खप सरकारचे व रेल्वेचे व लष्करी कारखान्याचे कामीं व परस्थ वस्तींतच बहुशा होतो. यामुळें त्या प्रमाणानें आपल्या देशांतील लोकांचें सामर्थ्य वाढलें असें होत नाहीं. नववें, विलायतेशिवाय इतर देशाशीं आपला व्यापार बऱ्याच मानानें वाढत चालला आहे. सुएज मधून आगबोटी थेट येऊं जाऊं लागल्यापासून युरोपांतील इतर देशाशीं आपला व्यापार नवीनच सुरू झाला आहे, हें चांगल्यापैकीं लक्षण आहे.

एकंदरींत आपल्या देशाच्या व्यापाराची स्थिति पहातां विलायतेशीं व अन्य देशांशीं आपला व्यवहार हल्लीं बऱ्याच मानानें वाढला आहे, यामुळें साधारणत: आनंद मानण्यासारखें कारण आहे, तथापि त्यांतील बारीक विचार पाहिला म्हणजे पुष्कळ अंशीं खेद व चिंता

वाटण्याजोगता प्रकार सदर व्यवहाराचा दिसून येतो. बाहेर देशाशीं आपली देवघेव वाढावी हें सर्वथा इष्ट आहे. देवघेव जितकी वाढेल तितकें आपलें ऐश्वर्य व सामर्थ्य वाढेल. परंतु, यांत अनिष्ट प्रकार हा आहे कीं, दिवसें दिवस आपल्या लोकांस शेतकीच्या उद्योगाशिवाय दुसरा उद्योग नाहींसा होत चालला आहे. आपण पिकवावें, विलायतेंतील कारागिरांनीं तें कमवावें, तें आपण वापरावें, ही स्थिति आपणास प्राप्त होत आहे. आपल्या सर्व लोकांनीं शेती करावी, व इतर काम धंदे व्यापार सोडून द्यावे, ही स्थिति इष्ट आहे किंवा अनिष्ट आहे, याचा विचार सर्वांनीं करण्यासारखी ही गोष्ट आहे. प्रथम तर हें सर्वांस ठाऊकच आहे कीं, शेतकीचा उद्योग फार पराधीनपणाचा आहे. स्थल, काल, ऋतुमान इत्यादिकांवर शेतकीचा उद्योग अवलंबून आहे. इतर कामधंद्याचे लोकांस सर्व स्थलें, सर्व काल, सर्व ऋतु, हीं बहुतांशीं सारखींच आहेत. हा पराधीनतेचा प्रकार इतका बलवत्तर आहे कीं, वर्षभर काबाड कष्ट केले, आणि भलतेच वेळीं पाऊस पडला, किंवा वारा सुटला, तर सर्व वर्षांचे श्रम व्यर्थ होऊन सारी प्रजा दुष्काळाचे मुखांत सांपडते. आपल्या देशांत सर्व देशांतील उत्कृष्ट जिनस पिकतात हें जरी खरें आहे, तरी एकंदरींत पुष्कळ भागांत पाण्याची फार कमतरता असल्यामुळें शेतकीच्या उद्योगास बरखत कमी आहे. कष्ट करणाऱ्या कुटुंबांचें पोट देखील वेळेस भरण्याची मारामार पडते. अमेरिकेसारख्या नव्या वस्तीचा व अतोनात समृद्धीचा मुलूख या देशांत फार थोडा आहे. सदरील कारणाकरितां एक शेतकीचाच उद्योग आपल्या सर्व प्रजेनें करावा, इतर गोष्टींचा नाद सोडून द्यावा, हा उपदेश आपल्यावर हल्लीं जे सत्ता चालवितात त्यांच्या मुखानें आपण ऐकतों हें नीटच आहे, परंतु तेच शद्ब पोपटाप्रमाणें आपण कांहीं न विचार करितां पुष्कळ प्रसंगीं बडबडतों हें मात्र आपणास शोभत नाहीं. शेतीच्या उद्योगांत सदरील पराधीनतेचा व मर्यादित फलद्रुपतेचा जो अडचणीचा प्रकार सांगितला, त्याचप्रमाणें तिसरी अडचण सरकारी अम-

लाची आहे. ही अडचण शेतीच्या उद्योगास जशी बाधते तशी इतर धंदेवाले लोकांस बाधत नाहीं. मुलुखांतील सर्व जमीन आपल्या मालकीची, त्यावर आपल्या स्वामित्वाचा भाग सोय अगर जरूर पडेल त्याप्रमाणें मागण्याचा आपला अधिकार आहे, असें सरकार ह्मणतें, व त्याप्रमाणें अम्मलही होत आहे, तेव्हां या उद्योगांत आपल्या लोकांची किफायत होईल हा संभव विशेष दिसत नाहीं. इतर धंद्याच्या उद्योगास काल स्थलाची अडचण विशेष नाहीं. मनुष्याच्या स्वाधीन सर्व व्यवसाय असतो, यामुळें त्यांत श्रमव्यवस्था विशेष करितां येते, व थोड्या मनुष्यांच्या उद्योगानें त्यांचें पोटास पुरून पुष्कळ माणसांच्या निर्वाहाची तजवीज होईल, अशा रीतीचें सार्थक होतें, त्याप्रमाणें शेतीच्या कामाची व्यवस्था नाहीं. विलायत देश विस्ताराच्या मानानें यःकश्चित आपल्या मुलुखांतील एखाद्या प्रांता येवढा देखील नाहीं, त्या देशांत शेतकीच्या उद्योगाकडे प्रजा फार कमी गुंतली आहे, इतर काम धंद्यांतच बहुतेक लोक खपतात, यामुळें त्या लहान मुलुखांत चार कोटी प्रजा सुखानें नांदते. केवळ शेतकीचाच उद्योग त्यांनीं केला तर त्यांच्या निम्मे प्रजेचा निर्वाह चवथाई सुखाचे मानानेंही झाला नसता हा अनुभव आपणा सर्वत्रांस आहे. खेरीज कोणत्याही देशांत सुपीक जमीन विस्ताराच्या, व दुरत्वाच्या, व हवा पाण्याच्या, समृद्धिच्या, व आंगच्या फलद्रुपतेच्या, संबंधानें फार थोडी असते. ती जमीन सर्व आटपून गेल्यावर कनिष्ठप्रतीची जमीन नांगरली जाते, व त्यांत उत्पन्नही होतें, परंतु असा नियम आहे कीं, श्रमाच्या प्रमाणानें उत्पन्न होत नाहीं, कमी होतें. एकंदर दुप्पट श्रम केला, अथवा दुप्पट जमीन नांगरली, तर पीक दुप्पट होत नाहीं, दीडपट होतें. असा प्रकार इतर धंद्याच्या कामांत नाहीं. दुप्पट श्रम केला, दुप्पट उद्योग वाढविला, तर दुपटीहून ज्यास्त प्राप्ति होते, असा सर्व साधारण नियम आहे.

सदरील विचार ज्यास पूर्णपणें कळून येतील त्यास व्यवहाराच्या संबंधानें या देशांत मुख्य शेतकीचा धंदा सर्व लोकांनीं केल्यानें आपल्या लोकांचें

इष्ट सिद्ध होत नाहीं, अनिष्ट घडून येतें, हा प्रकार उघड रीतीनें समजेल. या शिवाय हल्लींच्या स्थितीचा आपण विचार केला तरी देखील ह्याच प्रमाणें आपली मनोदेवता साक्ष देईल. साधारण शेतकरी लोक घेतले, व इतर कामधंद्याचे लोक आपल्या देशांत हल्लीं आहेत, तेच जरी घेतले, तथापि वर जो दोन्ही धंद्यांमधील थोडासा भेदाचा प्रकार वर्णिला आहे, त्या योगानें उभयतांच्या स्थितींत अंतर किती नेहमी राहतें हें सर्वांचे ध्यानांत येईल. साधारणपणें कामधंदा करणारी प्रजा शेतांत कष्ट करणाऱ्या प्रजेपेक्षां सधन, शहाणी, समंजस, एकजुटीनें वागणारी, अशी असते. शहरांतील वस्तींत व खेडेगांवच्या वस्तींत जो भेद दिसून येतो तो भेद अंशतः याच संबंधानें उत्पन्न होतो असें ह्मटलें असतां चालेल. तांबट, सुतार, लोहार, रंगारी, कासार, गवंडी, कुंभार, सर्व जातीचा क्रय विक्रय करणारे वाणी उदमी लोक, या लोकांमध्यें शेती कुणबी लोकांपेक्षां स्वतंत्रता, सधनता, शहाणपणा, ज्यास्ती नाहीं, असें कोण ह्मणेल. ही सर्व प्रजा नष्ट झाली, व या व्यवहाराच्या संबंधानें शहरें उद्ध्वस्त पडून आपण सर्व शेती करणारे बनलों, तर एकंदरींत सर्व देशाच्या सुखांत व सोयींत व सौभाग्यांत किती कमतरता पडेल याचा विचार ज्याचा त्यानीच करावा.

आपल्या हिंदुस्थान देशांतील उद्योगाची स्थिति बाहेर देशाशी आपला व्यापार होतो त्या संबंधानें दिवसेंदिवस कोणच्या तऱ्हेची होत चालली आहे, ह्मणजे आपण आवडधोबड शेतीचा उद्योग करून कच्चा माल पिकवावा, तो माल कमावण्याचा दुसरा कोणताही धंदा आपण करूं नये, त्या मालाची पुढील सर्व व्यवस्था विलायतेंतील लोकांनीं पहावी, व त्यांचे उद्योगाचें फळ मात्र आपण भोगावें, अशी स्थिति आपणास प्राप्त होत आहे, याबद्दल पूर्वीं विवेचन केलें. अशी देशांतील उद्योगाची स्थिति होणें हें इष्ट नाहीं, कारण शेतीचा धंदा नैसर्गिक रीतीनेंच पराधीन, परिमित फळ देणारा, सरकारच्या संबंधानें फार त्रास होणारा, अशा तऱ्हेचा हा धंदा आहे. याशिवाय साधरणतः समंजस-

पणांत व सुखसंपत्तींतही इतर कामधंदे करणारे लोकांपेक्षां शेतकरी लोक हे सर्वदा अडाणी व दुर्बळ असतात असा अनुभव आहे. शेतकरी लोकांची मजुरी इतर धंदेवाले लोकांच्यामजुरीपेक्षां कमी असते. शेतीच्या धंद्यानें पोट भरणाराचें सामर्थ्य पूर्वीं विस्तारानें लिहिल्याप्रमाणें परिमितीचें असतें. त्याच प्रमाणानें इतर धंदे करणारे लोकांचें सामर्थ्य अपरिमित आहे असें ह्मटलें असतां चालेल. ज्या देशांत केवळ शेतकरी लोकांपेक्षां, ह्मणजे खेड्यांत राहाणारे अथवा खेडू लोकांपेक्षां, नगरवासी लोकांची ह्मणजे इतर काम धंदे करणारे उदमी व कारागीर लोकांची वस्ती ज्यास्त असते, तोच देश सधन व सुखी असा साधारण सिद्धांत आहे. राज्यकारणी विचाराच्या संबंधानेंही असेच अंतर दिसून येतें. शेतकरी लोकांवर जुलूम झाला असतां त्यांचा एक जूट होत नाहीं, व त्या जुलमाचा बोभाटा होत नाहीं. इतर काम धंदे करणारे लोक बहुधा मोठ्या समुदायानें राहतात यामुळें, व त्यांस फुरसतही चांगली असते, व समजही चांगली असते, यामुळें, जुलुमाचा जोर फार वेळ चालत नाहीं, निदान बोभाटा तरी विशेष होतो. परस्थ लोकांच्या अंमलाखालीं जो देश आहे, त्याच्या संबंधानें हा विचार विशेष महत्वाचा आहे. जमिनीचा सारा दुप्पट वाढला त्याची दाद कोठें लागत नाहीं, परंतु इन्कमट्याक्स वगैरे उदमी लोकांवरील कर फार कमी दराचा असला तरी सर्व देशभर गवगवा होतो, हें प्रत्यक्ष उदाहरण आपल्या डोळ्यां समोर आहे. वरील सर्व विचार ध्यानांत आणले असतां परदेशाशीं जो आपला व्यापार होतो तत्संबंधानें जे परिणाम बरे वाईट देशांतील लोकांवर घडत आहेत, त्या परिणामापैकीं सर्वांस अनिष्टकारक असा हा प्रकार आहे हें कळून येईल. साधारणत: आपण आगगाडींतून बसून जातों, तारायंत्रांतून आपले निरोप धाडतों, विलायतेंत यंत्र सामर्थ्यानें जे सर्व सोयीचे व शोकाचे पदार्थ तयार होतात ते आपण आवडीनें भोगतों, या सुखांत आपण मग्न असतों, हा सर्व उत्साह

आपण करितों, व आपले डोळे दिपतात, त्यावेळीं उत्साहतेजाची पडछाया आपणास दिसत नाहीं, ह्मणून आपणास यांतच सुख वाटतें. परंतु आपल्या सारख्या समृद्ध देशांतील लोकांची अशी स्थिति व्हावी कीं, त्यांच्या निर्वाहाचे, सोयीचे, व शोकाचे, सर्व पदार्थ त्यांस तयार करतां येऊ नयेत, केवळ पदार्थ आयते तयार केलेले भोगण्याची मात्र अक्कल आपणास असावी ही मोठी दुःखाची गोष्ट आहे असें कोण ह्मणणार नाहीं, यामध्यें देशाचें सामर्थ्य वाढलें असें होत नाहीं, उलट दिवसेंदिवस आपण सर्व पुरुष बायका झालों आहोंत, अथवा लहान मुलें झालों आहोंत, त्या अवस्थेंत जसें दुसऱ्यावर अवलंबून राहणें जरूर पडतें, तद्वतच सर्व देशांतील प्रजेची स्थिति होत आहे, हें इष्ट आहे असें कोण ह्मणेल. आपल्यास असें वाटतें कीं, पहिल्या पेक्षां आपल्या देशाचा बंदोबस्त चांगला आहे, ह्या घमंडींत आपण निःशस्त्र झालों आहों ही गोष्ट विसरतों. हाच अनुभव सर्वत्र येत आहे. ह्मणजे राज्यसत्तेच्या संबंधानें आपल्या स्वतःचा बचाव करण्यास जसे आपण निर्बळ झालों आहों, त्याप्रमाणेंच व्यापार व व्यवहार यांच्या संबंधानें आपण आपलें पोषण व आच्छादन करण्यासही असमर्थ झालों आहों. ज्याप्रमाणें राज्यसत्तेच्या संबंधानें आपण परद्वीपस्थ लोकांचे दास झालों आहोंत, त्याचप्रमाणें व्यवहाराच्या संबंधानेंही आपण त्यांच्या दासांचे दास बनलों आहोंत. या व्यवहारसंबंधानें ज्या वेळेस विचार होतो त्या वेळीं अशा प्रकारची स्थिति आपली झाली आहे हें सर्व कबूल करतात, परंतु ह्याबद्दल आपणावर कोणीं जुलूम केला नाहीं, आपण सुखानें या पाशांत सांपडलों, तेव्हां यांत कुरकूर करण्यास जागा नसून विशेष शहाणपणही नाहीं, असें कित्येक ज्ञाते व सुखेच्छु पुरुष ह्मणतात, अमेरिकेंत ज्या वेळीं गुलामांची वस्ती होती, त्या वेळीं त्या देशांतील कित्येक ज्ञाते व सुखेच्छु पुरुष असेंच ह्मणत असत कीं, गुलामास आपल्या पोटापाण्याची कांहीं काळजी करावी लागत नाहीं, तोच गुलाम स्वतंत्र झाल्यास त्यास ही काळजी करावी लागेल, गुलामाची सर्व सोय त्या-

चा धनी पाहतो, यांत गुलामाचें काय वाईट होतें, शिवाय अशा स्थितीस गुलाम लोक फार खुष आहेत, इत्यादि अनेक प्रकारचें प्रतिपादन होत असे त्याच तऱ्हेचें हें वरील प्रतिपादन कांहीं अंशीं आहे. ज्या गोष्टी खरोखरी अनिष्ट असून त्यांचें प्रथम दर्शन उलट दिसतें, व लोकांस मोह पडतो, त्यांविषयींच विशेष जपलें पाहिजे. आपले लोक त्रिनवेभाटह्या भवितव्यास अनुसरत आहेत ह्मणूनच त्यांविषयीं आरडाओरड केली पाहिजे. एकंदरींत दिवसेंदिवस व्यवहारसंबंधानें पराधीनपणाची व निःसत्वपणाची दशा देशास प्राप्त होत आहे ही अनिष्ट आहे, इष्टफलदात्री नाहीं, ही गोष्ट सर्वत्रानीं गृहित केली पाहिजे.

यांत दुसरा विचार असा आहे कीं, हा देश अगदीं रानटी स्थितींत असता तर असली पराधीनताही इष्ट झाली असती, परंतु ज्या पदार्थांच्या संबंधानें आपण आज इतके विलायतेवर अवलंबून राहत आहोंत तेच पदार्थ उलटे आपल्या देशांतून आज ३०–४० वर्षांपूर्वीं विलायतेस जात होते, हा विचार मनांत आणला ह्मणजे आपण हल्लींची स्थिति बरी आहे असें मानून समाधान करून घेतों यांत आपल्या मुर्खपणाची पराकाष्टा होते. ह्माबद्दल मुंबई बंदराच्या व्यापाराची तपशिलवार हकीकत मिळाली नाहीं, परंतु कलकत्त्याबद्दल हकीकत तिकडील एका एतद्देशीय विद्वान गृहस्थानें छापली आहे, त्यावरून असें दिसून येते कीं. १८१३–१४ सालीं विलायतेहून ९०००० रुपयांचें कापड इकडे आलें, तेंच कापड १८७१–७२ सालीं, ह्मणजे साठ वर्षांत ९॥ कोट रुपयांचें आलें, ह्मणजे साठ वर्षांत शंभर पटीनें फरक पडला. खालील कोष्टकावरून हा प्रकार स्पष्ट होईल.

शेकडा पांच टक्के जकात होती ती दहा टक्के केली तेवढ्या अवकाशांत मुंबईंत सुताचे व कापडाचे कारखाने पुष्कळ निघाले, त्याची व्यवस्था सर्व प्रकारें नीट नाहीं तथापि ते कारखाने आजपर्यंत जीव धरून आहेत येवढेंच नाहीं, परंतु जकात पुनः पूर्ववत् झाली तरी कारखान्यांची संख्या वाढत चालली आहे. हल्लीं या कारखान्याचे कामीं तीन कोट रुपये आपल्या लोकांचे भांडवल गुंतलें आहे, व त्यावर २००००, मजुर लोकांचा निर्वाह होत आहे. सर्व वेळ स्वहिताकरितां इंग्लिश लोक जो आपणास यासंबंधानें बोध करितात कीं, आपण कारखान्यांच्या व यंत्राच्या नादीं लागू नये, कच्चा माल पिकवून विलायतेस धाडावा, हाच आपला कृतार्थ व्यवहार संबंधानें आहे, तो बोध खरा असें मानणें हें आपल्या स्वामिभक्तीस मोठें भूषण आहे, परंतु एकंदरींत त्यांत शहाणपणा नाहीं.

आपल्यास जी शस्त्रें व दारू लढाईच्या कामीं उपयोगीं पडतात तीं हवीं असलीं तर अन्य देशांत तीं आपल्यापेक्षां स्वस्त होतात, येवढ्याच कारणानें आपल्या देशांत तीं स्वतंत्र उत्पन्न करण्याचा उद्योग करूं नये, असें कोण ह्मणेल ? ज्याप्रमाणें स्वतःच्या बचावाविषयींच्या तजविजीबद्दल केवळ पैशाच्या नुकसानीकडे पाहाणें बरोबर नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या आन्नाच्छादनाचा विचार आहे. याविषयीं तरी निदान प्रत्येक मोठा देश स्वतःसिद्ध असावा हें जरूर आहे, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हा विचार केवळ अर्थशास्त्राचा नाहीं. एकंदर राज्य कारण, व देश व्यवस्था, व सर्व राष्ट्ररूपी कुटुंबाचा प्रपंच या तिन्ही व्यवस्था पाहिल्या असतां यांतील गूढार्थ ध्यानांत येईल.

समाप्त.

त्यानें झालेलें कापड टिकाव धरील असें दिसत नाहीं. तथापि जेथें जेथें धर्माच्या संबंधानें किंवा प्रचाराच्या संबंधानें कांहीं विशेष निग्रह किंवा प्रत्यवाय करून ठेवला आहे, तितक्या पुरतें अजून या देशांत कापड तयार होत आहे. साधारणत: जेथें दोन पैशांत काम होणार आहे, तेथें चार पैसे द्यावे अशी बुद्धी कोणाम्ही व्यवहारांत होत नाहीं. हें म्हणणें खरें आहे, तथापि हे जितकें खरें आहे, तितकेंच मानानें उंच ठेवलेल्या पदार्थास हात लावणें असेल तर पायाखालीं कांहीं घेऊन त्यावर उभें राहिलें पाहिजे हेंही ह्मणणें खोटें नाहीं. मुळींच सवड दिली नाहीं तर लोकांच्या हातून उद्योग तरी कसा व्हावा. विलायतेबरोबर अखेर धाव मारणें असेल तर, यंत्रसामर्थ्यानेंच मारली पाहिजे, हें खरें आहे. तथापि कांहीं काळपर्यंत ज्याप्रमाणें हल्लीं आवड, विशेष गुणाच्या संबंधानें नाहीं, परंतु केवळ लौकिक अनुकरणानें विलायती, मालावर जशी बसली आहे, तशी गांवठी मालावर बसल्यास कांहीं उद्योग करण्यास आवकाश मिळेल. या संबंधानें अन्य देशाच्या लोकांचें वर्तन पाहूं जातां ते आपल्या प्रमाणें अर्थशास्त्राचे सिद्धांत घोकून-कपाळास हात लावीत नाहींत. जो उद्योग आपल्या देशांत व्हावा, ज्या उद्योगाच्या संबंधानें देश स्वतंत्र असावा असें त्यांस वाटतें, त्या उद्योगास उत्तेजन येण्याकरितां त्या तऱ्हेचा माल बाहेर देशांतून येतो त्यावर जबर जकात ठेवून तसा माल आपल्या मुलखांत तयार करितात. त्या जकातीच्या संबंधानें प्रथम थोडी बहुत ज्यास्त किंमत द्यावी लागते, तथापि ते लोक त्या तोट्याकडे विशेष पहात नाहींत. अमेरिकेची स्थिति याप्रमाणें आहे. विलायतेहून कापड तिकडे जातें त्यावर विशेष जकात त्यांनीं ठेवली यामुळें अमेरिकेंत कापड तयार करण्याचा प्रथम उद्योग वीस वर्षांत सुरू झाला. हल्लीं निमा अधिक कापूस अमेरिकेंतील कारखान्यांत खपून कापड तयार होतें. फ्रान्स, बेलजम, वगैरे देशांतही याचप्रमाणें राज्यकारणी पुरुष व्यवस्था करीतात. विल्सन साहेबानीं १८६० सालीं विलायतेहून येणाऱ्या कापडावर

| कापड हिंदुस्थानांतून अन्यदेशीं गेलें. | | अन्य देशांहून हिंदुस्थानांत आलें. |
|---|---|---|
| १८१३–१४ | ५३ लाख रु. | ९२००० रुपये. |
| १८१४–१५ | ८५ " | ४५००० " |
| १८१५–१६ | १३१ १/२ " | २ २/५ लाख रुपये |
| १८१६–१७ | १६६ " | ३ १/६ " |
| १८१७–१८ | १३२ ३/४ " | ११ १/४ " |
| १८१८–१९ | ११५ १/१० " | २६ १/२ " |
| १८१९–२० | ९० १/८ " | १५ १/४ " |
| १८२०–२१ | ८५ १/४ " | २५ १/२ " |
| १८२१–२२ | ७६ २/३ " | ४६ ३/४ " |
| १८२२–२३ | ८० " | ६५ १/४ " |
| १८२३–२४ | ५८ ३/४ " | ३५ १/५ " |
| १८२४–२५ | ६० १/६ " | ५३ " |
| १८२५–२६ | ५८ १/८ " | ४१ १/४ " |
| १८२६–२७ | ३९ १/२ " | ४३ १/२ " |
| १८२७–२८ | २६ ३/४ " | ५२ १/२ " |
| १८२८–२९ | २२ १/४ " | ८० " |
| १८२९–३० | १३ १/४ " | ५२ १/४ " |
| १८३०–३१ | ८ १/२ " | ६० १/८ " |
| १८३१–३२ | ८ १/२ " | ४५ १/२ " |
| १८३२–३३ | ८ १/४ " | ४२ १/२ " |

एकंदर वीस वर्षांत किती फरक पडला हें वरील आंकड्यावरून कळेल. १८३३–३४ चे सुमारास वाफेच्या सामर्थ्यानें मोठीं यंत्रे चालविण्याचे प्रथय कारखाने विलायतेस निघूं लागले, तेव्हांपासून सर्वच चक्र फिरलें. त्यांच्या यंत्रसामर्थ्यापुढें आपल्या हस्तकौश-